अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

**मंगळवार दिनांक २९/०३/२०१६ रोजी सकाळी ११.०० वाजता महानगरपालिका सभागृहात होणा-या मा.सर्वसाधारण सभेची विषय पत्रिका.**

| **विषय क्र.** | **विषय** |
|---|---|
| ६० | अहमदनगर महानगरपालिकेचे सन २०१५-२०१६ चे सुधारित व सन २०१६-२०१७ चे मुळ अंदाजपत्रकाचा विषय मा.महासभेत घेणे बाबत.. |
| ६१ | मा.सदस्य यांचे रजेचे अर्ज. |

मा.महापौर यांचे मान्यतेने.
दिनांक : १९/०३/२०१६.
अहमदनगर.

प्र.नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.**

जा.क्र.अम / सका - ०६ / २०१६.
महानगरपालिका सचिव कार्यालय.
दिनांक : १९-०३-२०१६.

**अहमदनगर महानगरपालिकेच्या अंदाजपत्रकीय सर्वसाधारण सभेची सुचना.**

(महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची ड चे प्रकरण - २ नियम क्र.१ (अ) अन्वये )

**सभा सुचना क्रमांक ०६, मंगळवार दिनांक २९-०३-२०१६.**

प्रति,
सन्मा.श्री. / श्रीमती.....................................................

सदस्य,
अहमदनगर महानगरपालिका,
अहमदनगर.

यांस-

महोदय,

याद्वारे कळविण्यांत येते की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची ड चे प्रकरण २ नियम क्र.१ (अ) अन्वये मा.महापौर यांनी अहमदनगर महानगरपालिकेची अंदाजपत्रकीय सर्वसाधारण सभा **मंगळवार दिनांक २९-०३-२०१६ रोजी सकाळी ११.०० वाजता नविन प्रशासकीय इमारत, औरंगाबाद रोड येथील महानगरपालिका सभागृहात** सोबतच्या विषय पत्रिकेतील कामकाज चालविण्यांसाठी आयोजित केली आहे.

आपणांस सभेस उपस्थित राहण्याची विनंती करण्यांत येत आहे.

सोबत : १. विषय पत्रिका
२. प्रस्तावाची टिप्पणी.

प्र.नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.**

जा.क्र.अम / सका - ०६ / २०१६.
महानगरपालिका सचिव कार्यालय.
दिनांक : १९-०३-२०१६.

प्रति,
सन्मा.श्री. / श्रीमती.....................................................

सदस्य,
अहमदनगर महानगरपालिका,
अहमदनगर.

यांस-

महोदय,

याद्वारे कळविण्यांत येते की, अहमदनगर महानगरपालिकेची अंदाजपत्रकीय सर्वसाधारण सभा मंगळवार दिनांक २९-०३-२०१६ रोजी सकाळी ११.०० वाजता आयोजित केली होती. या सभेत अंदाजपत्रक सादर केल्यानंतर त्यावर अभ्यासासाठी सदस्यांना अवधी मिळावा या मागणीनुसार सदरची सभा मा.महापौर यांनी तहकुब करुन, **तहकुब सभा --- वार दिनांक /०३/२०१६ रोजी सकाळी ११.०० वाजता नविन प्रशासकीय इमारत, औरंगाबाद रोड येथील महानगरपालिका सभागृहात** पुढे सुरु होईल असे आदेशीत केले आहे.

आपणांस सभेस उपस्थित राहण्याची विनंती करण्यांत येत आहे.

प्र.नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**सभा क्रमांक ०६**

**प्रस्ताव क्रमांक : ६०** **दिनांक २९/०३/२०१६**

---

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे सन २०१५-२०१६ चे सुधारित व सन २०१६-२०१७ चे मुळ अंदाजपत्रकाचा विषय मा.महासभेत घेणे बाबत..

--*--

**प्रस्तावाचा मजकुर :-**

अर्थ विभाग जा.क्र.९६७ दिनांक १९/०३/२०१६ अन्वये विनंती टिप्पणी देण्यांत येते की, अहमदनगर महानगरपालिकेचे सन २०१५-२०१६ चे सुधारित व सन २०१६-२०१७ चे मुळ अंदाजपत्रक (मनपा शिक्षण विभाग शेअर्ससह) मा.स्थायी समिती ठराव क्रमांक ७३ दिनांक ०३/०३/२०१६ अन्वये शिफारसीसह मंजुरीस्तव मा.महानगरपालिका सभेपुढे ठेवण्यास सुचित केले आहे.

तरी सन २०१५-२०१६ चे सुधारीत व सन २०१६-२०१७ चे मुळ अंदाजपत्रक (मनपा शिक्षण विभाग शेअर्ससह ) चा विषय मा.महानगरपालिका सभेपुढे घेणेत यावा, हि विनंती.

यावर प्र.नगरसचिव यांचा अभिप्राय की, मा.महापौर साहेब यांचेकडेस मा.महासभेची तारीख व वेळ मिळणेबाबत आदेशार्थ सादर.

यावर मा.महापौर साहेब यांचा अभिप्राय की, नगरसचिव दिनांक २९/०३/२०१६ रोजी सकाळी ११.०० मा.अर्थसंकल्पीय सर्वसाधारण सभा बोलाविणेत यावी.

---*---

**मा.स्थायी समिती ठराव क्रमांक ७३ दिनांक ०३/०३/२०१६ :-** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९चे कलम ९५ व ९६नुसारअहमदनगर महानगरपालिकेचे सन २०१५-२०१६ चे सुधारित व सन २०१६-२०१७चे मुळ अंदाजपत्रक (कर,दर प्रस्तावासह) व त्या सोबतचे दरवाढ करणेबाबत सादर केलेले प्रस्ताव स्थायी समिती सभे समोर पाहिले. ते पुढील प्रमाणे.

प्रस्ताव क्र. १ :- पाणी पुरवठा विभाग - पाणीपट्टीचे दरात वाढ करणेबाबत.
प्रस्ताव क्र. २:- अग्निशमन विभाग - अग्निशमन कर लावणबाबत.
प्रस्ताव क्र. ३ :- आरोग्य विभाग - फिरता दवाखाना आरोग्य सुविधा निःशुल्क करणेबाबत.
प्रस्ताव क्र. ४:- आरोग्य विभाग - मनपा सर्व दवाखाने,नागरी आरोग्य केंद्रा बाबत.
प्रस्ताव क्र. ५:- आरोग्य विभाग - अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील कुष्ठ पिढीत, कुष्ठ पिढीत अपंग रूग्ण व मनोरूग्ण (वेडे ) यांना अर्थसहाय्य देणे बाबत.

**वरील प्रस्तावावर झालेल्या चर्चे नुसार**

**प्रस्ताव क्र.१.:-**घरगुती वापर ची पाणीपट्टी दरा मध्ये वाढ न करता इतर कारणांसाठीची व्यावसायीक ,औदयोगीक, ,टॅकर ने पाणीपुरवठा करणे या प्रस्तावीत वाढीव दरास ही सभा मान्यता देत आहे.

**प्रस्ताव क्र.२ :-** अग्निशमन कर २%लागू करण्याचा प्रस्ताव ना मंजूर करण्यात येत आहे.

**प्रस्ताव क्र.३:-** फिरत्या दवाखान्यामार्फत पुरविण्यात येणा-या आरोग्य सुविधा नि:शुल्क करण्याच्या प्रस्तावास मान्यता देत आहे.

**प्रस्ताव क्र.४:-** आरोग्य विभाग - मनपा सर्व दवाखाने,नागरी आरोग्य केंद्रा बाबत.ऑफिस रिपोर्ट नुसार रूग्णांच्या अत्यल्प प्रतिसाद असलेले शहरी भागातील काही दवाखाने कायम स्वरूपी बंद करणे आणि हद्द वाढीतील उपनगरांसाठी नवीन दवाखाने सूरू करणे आणि त्या अनुशंगाने जागा म.न.पा.स्वमालकीची किंवा भाडेतत्वावर उपलब्ध करणे,कर्मचारी व त्या अनुशंगाने इतर आवश्यक बाबी इत्यादीची तरतुद सन २०१६-१७ चे अर्थसंकल्पात महिला व बालकल्याण समिती लेखाशिर्षाकामध्ये करण्याबाबत च्या प्रस्तावानुसार अत्यल्प प्रतिसाद असलेले शहरी भागातील काही दवाखाने कायम स्वरूपी बंद करणे आणि हद्द वाढीतील उपनगरांसाठी नवीन दवाखाने सूरू करणेस ही सभा समान्यता देत आहे. तथापी त्या अनुशंगाने जागा म.न.पा.स्वमालकीची किंवा भाडेतत्वावर उपलब्ध करणे,कर्मचारी व त्या अनुशंगाने इतर आवश्यक बाबी इत्यादीचा खर्च महिला व बालकल्याण समिती लेखाशिर्षा मध्ये दर्शविण्यात येउ नये. याकामी पुर्वी वापरण्यात येणारे लेखाशिर्षच वापरण्यात यावे.

**प्रस्ताव क्र. ५ :-** आरोग्य विभाग - अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील कुष्ठ पिढीत,कुष्ठ पिढीत अपंग रूग्ण व मनोरूग्ण (वेडे ) यांना प्रति रुग्ण, प्रति महिना रक्कम रु.१,०००/- अर्थसहाय्य देणे बाबत चा प्रस्ताव मंजूर करण्यात येत आहे. त्या करीता रक्कम रूपये १०लाख तरतुद करण्यात यावी.

अ.नगर महानगरपालिकेचे सन २०१५-२०१६ सालचे सुधारित व सन २०१६-२०१७ सालचे म.न.पा. शिक्षण विभागाच्या शेअरसह मुळ अंदाजपत्रकावर सविस्तर सखोल चर्चा करणेत येवुन ही सभा मा.सदस्य यांनी केलेल्या सुचना तसेच दुरूस्ती व फेरफारसह शिफारस करित आहे.

अहमदनगर महानगरपालिकेचे सन २०१५-२०१६ सालचे सुधारित व सन २०१६-२०१७ सालचे अंदाजपत्रकावर सभेमध्ये झालेल्या सविस्तर चर्चेप्रमाणे सोबत जोडलेल्या तक्त्यामध्ये दर्शविल्यानुसार अंदाजीत जमा खर्चाच्या रकमा फेरफार करणेस तसेच नागरिकांना महत्वपूर्ण नागरी सुविधा देण्यासाठी आवश्यक ती तरतुद करणेस ही सभा सर्वानुमते मंजूरी देणे बाबत शिफारस करीत आहे. (**सोबत**-सन २०१५-२०१६ च्या सुधारीत व सन २०१६-२०१७ सालचे मुळ अंदाजपत्रकामध्ये केलेल्या बदलांचा तक्ता)

मा.आयुक्त साहेब यांनी मनोगतामध्ये व्यक्त केलेली कामे व सुचविलेल्या योजना राबविणे कामी उपाययोजना करणेस ही सभा शिफारस करित आहे.

**तसेच**

* शहरातील हॉस्पीटल,हॉटेल्स तसेच वर्दळीची सार्वजनीक ठिकाणे येथे ज्या ठिकाणी मोठयाप्रमाणात दु चाकी व चार चाकी वाहनांचे पार्किग केले जाते. त्या जागा निश्चित करून विहीत पध्दतीने भाडे तत्वावर देवून पार्किग व्दारे मिळणारे उत्पन्न वाढविण्यात यावे. पे ॲण्ड पार्क पासून मिळणारे उत्पन्न रूपये ९.९५ लाख इतकी तरतूद वाढविण्यात यावी.

*नविन घरांना घरपटटी लागु करणे बाबत पाठपुरावा करून तसेच जी.आय.एस.च्या माध्यमातून मालमत्ता धारकांच्या प्रॉपर्टी ज्यांची महानगरपालिकेकडे नोंद नाहीत. अशा प्रॉपर्टी जी. आय.एस.प्रणाली व्दारे शहराचे सर्व्हेक्षण चे काम ५० % पुर्ण झाले असून या सर्व्हेक्षणातुन १० हजार नविन प्रॉपर्टी सापडल्या आहेत. सर्व्हेक्षणाचे काम पुर्ण झाल्या नंतर यामध्ये अंदाजे १० हजार प्रॉपर्टी नव्याने भर पडेल.एकुण २० हजार प्रॉपर्टीची नव्याने वाढ होवून घरपट्टी उत्पन्नात मोठया प्रमाणात वाढ होईल.सर्वसाधारण कराच्या लेखाशिर्षामध्ये १५टक्के वाढ करण्यात यावी.

* नवीन वैद्यकीय व्यावसायीकांचा शोध घेवून मुंबई नर्सिग ऑक्ट अंतर्गत फि पासून मिळणा-या उत्पन्नात वाढ होण्याच्या दृष्टीने कार्यवाही करावी. लेखाशिर्षामध्ये रु.१ लाखाने तरतुदीमध्ये वाढ दर्शविण्यांत यावी.

* गाळे धारकांकडून थकित असलेली सर्व भाडे रक्कम त्वरीत वसूल करण्यात यावी. या लेखाशिर्ष मध्ये रू.३० लाख वाढ करण्यात यावी.

* अनाधिकृत हस्तांतरण व गाळयांच्या अंतर्गत बदल केलेल्या गाळे धारकांकडून त्या पोटी फि वसूल करण्यात यावी. यामुळे या लेखाशिर्ष मध्ये रू.२० लाख वाढ करण्यात यावी.

*अनाधिकृत बांधकाम नियमानुकूल करणे या लेखाशिर्षकामध्ये रू.५० लक्षांनी वाढ करण्यात यावी.

*जाहीरात बोर्ड जागा भाडे ही बाब उत्पन्नाच्या दृष्टीने अत्यंत महत्वाची असुन या विभागाकरीता कर्मचारी वर्ग वाढविण्यांत येवून संपुर्ण शहराचा सर्व्हे करुन वसुली केल्यास निश्चितच उत्पन्नात भर पडेल. शहराचा वाढता विस्तार व व्यवसाय लक्षात घेता या माध्यमातुन सुमारे रू.५०लाख रुपये वाढ करण्यात यावी.

* शहरातील मालमत्ता खरेदी -विक्री झाल्यावर त्यांची नोंदणी महानगरपालिके कडे करण्यात येत नाही.त्या मुळे नांव नोंदणी शुल्क हा महसूल मोठया प्रमाणात बुडतो.,अशी प्रकरणे शोधून त्या मालमत्तेवर नांव लावण्याची कार्यवाही करण्याच्या दृष्टीने प्रयत्न करावेत त्या मुळे नांव नोंदणी मध्ये नव्याने दाखल होणा-या प्रकरणांचा ओघ पहाता तरतुद उत्पन्नात रु.५० लाख वाढ करावी.

*अहमदनगर शहरामध्ये नव्यावे गॅन्ट्रीज उभारण्यात येणार आहेत.तसेच महानगरपालिकेने तत्सम उपक्रम घेतल्यास रॉयल्टीचे उत्पन्न मिळणार आहे.गॅन्ट्रीज रॉयल्टी या नावाने लेखाशिर्ष नव्याने तयार करून या मध्ये तरतुद रू.२५ लक्ष करण्यात यावी.

*महानगरपालिका शाळा भाडे पासून मिळणा-या उत्पन्नात वाढ होणेच्या दृष्टीने थकबाकी वसूली व अन्य उपाययोजना कराव्यात रू.२५लाखाने उत्पन्नात वाढ दर्शविण्यात यावी.

*महानगरपालिकेस असणा-या सुट्टीच्या दिवशी किंवा विनापरवाना शहरामध्ये ब-याच ठिकाणी रस्ते फोडणे, ड्रेनेज व पिण्याच्या पाण्याची लाईन जोडणे असे प्रकार घडल्याचे निदर्शनास येत आहे याकरीता सदर बाबत बारकाईने लक्ष देवुन अशा प्रकारच्या कामाची फी वसुल केल्यास निश्चितच उत्पन्नात भर पडेल. यादृष्टीने उपाय योजना करण्यांत यावी. यामध्ये रू.३० लाख रुपयांनी तरतुदीमध्ये वाढ दर्शविण्यांत यावी.

खर्च

*मा.शासनाकडुन सिटी सर्व्हेचे काम मोफत होणेच्या दृष्टीने पाठपुरावा करण्यांत यावा तसेच याकामी महानगरपालिकेस खर्च करण्याच्या दृष्टीने रक्कम रु.३ लाख तरतुद ठेवण्यांत यावी.

*महानगरपालिकेच्या विविध सत्कार समारंभप्रसंगी गार्डन विभागा कडून खरेदी करीता हार,बुके,गुच्छ खरेदी करीता सन २०१५-१६ मध्ये तरतुद रूपये ३ लक्ष २० हजार ऐवजी सूधारून रूपये ५लाख ५० हजार एवढी करण्यात यावी. या लेखाशिर्षात सन २०१६-१७ करीता रूपये ५ लाख ५०हजार इतकी तरतुद करण्यात यावी.

* रस्ते दुरूस्ती (पॅचिंग व मुरूम टाकणे ) हे लेखाशिर्षा चे नांव बदलून त्या ऐवजी रस्ते दूरूस्ती- १. डांबरीकरण २. सिमेंट कॉक्रीटीकरण ३. खडी करण असे लेखाशिर्ष करणे.या लेखाशिर्षात सन २०१६-१७ करीता रूपये ८० लाख इतकी तरतुद करण्यात यावी.ही तरतूद ४ प्रभाग समिती कार्यालयांकरीता प्रत्येकी २० लाख इतकी निर्धारीत करून दयावी.या ८० लाख तरतूदी पैकी रूपये ५० लाख रूपये डांबरीकरण, रू.२० लाख सिमेंट कॉक्रीटीकरण,रू.१० लाख खडी करण करणे अशी विभागणी उपलेखाशिर्ष करून कारण्यात यावी.

* नविन रस्ते अ - रस्ते खडीकरण, या लेखाशिर्षाअंतर्गत सन २०१६-१७ वर्षा करीता तरतूद रू.५ लाख ऐवजी १० लाख करण्यात यावी.

*नविन रस्ते ब - रस्ते डांबरीकरण व नुतनी करण या लेखाशिर्षाअंतर्गत सन २०१६-१७ वर्षा करीता तरतूद रू.७ लाख ऐवजी रू.१० लाख करण्यात यावी.

*नविन इमारती या लेखाशिर्षा अंतर्गत तरतूद रू.२० लाखाने वाढवून रू.५० लाख करण्यात यावी.आणि बुरूडगांव क्षेत्रीय कार्यलय हे नविन इमारती या लेखाशिर्षा अंतर्गत असलेल्या तरतूदी मधून विकसीत करण्यात यावे.

*प्रत्येक प्रभाग समिती ला रूपये ४ लाख ठेवले त्याऐवजी रूपये १० लाख तरतूद ठेवा.

*अहमदनगर महानगरपालिकेचे पदाधिकारी यांचेकडे नागरी सुविधेची मागणी करणेकामी नागरीकांचे शिष्टमंडळे येतात. तसेच इतरही मा.सदस्य सुचना करतात या सर्व बाबींचा विचार करुन पुढील प्रमाणे लेखाशिर्ष निहाय तरतुदी करण्यांस ही सभा शिफारस करीत आहे. महापौर शहर विकास निधी रू.२ कोटी उपमहापौर शहर विकास निधी रु.५० लाख व स्थायी समिती सभापती शहर विकास निधीमध्ये ५० लाख रुपयांची तरतुद करण्यांत यावी. तसेच सभापती महिला व बालकल्याण समिती, विकास निधी १५ लाख, उपसभापती महिला व बाल कल्याण विकास निधी १० लाख इतकी तरतुद करण्यांत यावी. या निधी करीता प्रत्यक्ष रक्कम उपलब्ध व्हावी या करीता प्रत्येक निधी चे स्वतंत्र्य बॅक खाते उघडून दर आठवडयाला त्यामध्ये ठराविक रक्कम वर्ग करण्यात यावी.

*वॉर्ड विकास निधीमध्ये रक्कम रु.१ कोटी ८५ लाखाची तरतुद करावी.

* प्रभाग क्र.३० बुरूडगांव रोड श्रीराम नगर अंतर्गत रस्ते कॉक्रीटीकरण करणे २० लाखाची तरतूद करण्यास ही सभा शिफारस करीता आहे.स्वतंत्र लेखाशिर्षक तयार करण्यात यावे.

*भांडवली खर्च अ - अंदाजपत्रक मध्ये २६ अ असे नविन लेखाशिर्ष डॉ.बाबासाहेब आंबेडकर सुवर्ण जयंती शतकोत्तर महोत्सव विविध उपक्रम राबविणे या नावाचे तयार करण्यात यावे व सन २०१६-१७ करीता त्या मध्ये रू.१० लाख इतकी तरतूद करण्यात यावी.

* महात्मा ज्योतीबा फुले पुर्णाकृती पुतळा उभारणे व सुशोभिकरण करणे या लेखाशिर्षामध्ये सन२०१६-१७ करीता रू.१० लाख इतकी तरतूद करण्यात यावी.

* कै.बा.दे.दवाखाना नुतनीकरण करणे या लेखाशिर्षा मध्ये सन २०१६-१७ रू.१० लाख इतकी तरतूद दर्शविण्यात यावी.

* बुरूडगांव रोड व केडगांव या उपनगरामध्ये उद्यान विकसीत करणे (प्रत्येकी रू.२५ लाख) या लेखाशिर्षा मध्ये सन २०१६-१७ करीता तरतूद रू.५० लाख इतकी दर्शविण्यात यावी.

* पिंपळगांव माळवी येथील अहमदनगर महानगरपालिकेच्या जागेमध्ये बी.ओ.टी. तत्वावर पर्यटन केंद्र विकसीत करण्यात यावे.या बाबत आवश्यक ती कार्यवाही प्रकल्प विभाग प्रमुख यांनी करावी.

*अहमदनगर शहरातील गणपती मिरवणूक मार्ग,मोहरम मिरवणूक मार्ग व प्रमुख चौक येथे मा.जिल्हा पोलिस प्रमुख यांचे पत्रा नुसार सी.सी.टि.व्ही कॅमेरे बसविण्यात यावेत.या करीता प्रमुख चौकात सी.सी.टि.व्ही कॅमेरे बसविणे या लेखाशिर्षा अंतर्गत सन २०१६-१७ या वर्षा करीता रू.१० लाख इतकी तरतूद करण्यात यावी.

*अध्यक्ष शिववरद प्रतिष्ठाण,रंगारगल्ली, अहमदनगर यांनी शहर वासीयांसाठी सांस्कृतीक महोत्सव भरविणे कामी स्थायी समितीस रूपये १लाख ५० हजार इतक्या अर्थसहाय्याची मागणी केली आहे.तरी सदर संस्थेस निधी उपलब्ध करून देण्यास ही सभा मान्यता देत आहे.सामाजीक संस्थांना देणगी या लेखाशिर्षाअंतर्गत रू.१लाख ५० हजार इतकी वाढ करण्यात यावी.

* बुरूडगांव रोड भागातील माडगे मळा अंतर्गत ड्रेनेज लाईन व अंतर्गत रस्ते मजबुतीकरणासह डांबरीकरण करणे रू.२५ लाखाची तरतूद करण्यास ही सभा शिफारस करीता आहे.स्वतंत्र लेखाशिर्षक तयार करण्यात यावे.

*पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर स्मारक भिस्तबाग परिसरात उभारणे/ चौक सुशोभिकरण या लेखाशिर्षावर रू.१० लाख इतकी तरतूद सन २०१६-१७ या वर्षा करीता दर्शविण्यात यावी.

*मॉडेल रस्ता विकसीत करणे या लेखाशिर्षा अंतर्गत कार्यावाही करतांना अहमदनगर महानगरपालिकेच्या ४ प्रभाग समिती कार्यालया अंतर्गत येणा-या भागातील संभाव्य रस्ते निवडून त्या पैकी एका रस्त्याची निवड चिठ्ठी काढून करण्यात यावी.

*क्र.५४ शासकीय अनुदाने मधील १२ वा/१३वा/१४वा वित्त आयोग या लेखाशिर्षा अंतर्गत सन २०१६-१७ या वर्षा करीता तरतूद रू.२० कोटी दर्शविण्यात यावी.

*अमृत योजना - सोलरप्रकल्प उभारणे म.न.पा.हिस्सा / कर्ज या लेखाशिर्षा अंतर्गत खर्च करतांना महानगरपालिका नविन प्रशासकीय इमारत व अमरधाम येथे सोलर प्रकल्प राबवावेत.

* प्रकल्प विभाग अ.नं.१७ घनकचरा प्रक्रिया व विल्हेवाट अनुदान या लेखाशिर्षा अंतर्गत सन २०१६-१७ करीता रू.२.५० कोटी इतकी तरतूद दर्शविण्यात यावी.

* प्रकल्प विभाग अ.नं.१८ घनकचरा प्रक्रिया व विल्हेवाट म.न.पा हिस्सा या लेखाशिर्षा अंतर्गत सन २०१६-१७ करीता रू.२.५० कोटी इतकी तरतूद दर्शविण्यात यावी.

* सिनानदी सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प उभारणे कामी खर्च अमृत योजना या लेखाशिर्षा वर -शहर भुयारी गटर योजना मनपा हिस्सा अंतर्गत सन २०१५-१६ करीता रू.३ कोटी इतकी तरतूद दर्शविण्यात यावी.

*प्रकल्प विभाग अ.नं.१९ ब हे नविन लेखाशिर्ष मैला,मलनि:स्सारण प्रक्रिया प्रकल्प उभारणे या नावाने तयार करून त्यावर सन २०१६-१७ या वर्षा करीता रू.५ कोटी इतकी तरतूद दर्शविण्यात यावी.

*आरोग्य विभागाने सादर केलेल्या प्रस्तावानुसार नाविन्यपुर्ण योजना अनुदान (रक्त विघटन प्रयोग शाळा कार्या न्वत करणे ) हे नविन लेखाशिर्ष तयार करून सन २०१५-१६ करीता रू.७५ लाख व सन २०१६-१७ करीता रू.७५ लाख इतकी तरतूद दर्शविण्यात यावी.

*आपत्कालीन व्यवस्थापन खर्च (ड्रेनेज,गटर,रस्ते,इ.)या लेखाशिर्षात दुरूस्ती करून रस्ते या शब्दाऐवजी -नाल्या,पाणी पाईपलाईन दुरूस्ती - असे नांव कारण्यात यावे आणी लेखाशिर्षाअंतर्गत तरतूद रूपये १ कोटी दर्शविण्यात यावी.

* भांडवली खर्च "क" अंदाजपत्रक मधील जलनि:स्सरण विभाग क्र.८ अ वर कायम (बांधकाम ) हे दर्शवून त्यामध्ये सन २०१६-१७ रू.१० लक्ष इतकी तरतूद दर्शविण्यात यावी.

*अग्निशमन विभागा करीता प्रशिक्षीत कर्मचारी वर्ग मिळावा या करीता ठेका पध्दतीने फायरसब ऑफीसर,फायरमन व वाहन चालक न घेता मानधनावर विहीत पध्दतीने नियुक्ती करून कर्मचारी घेण्यात यावेत या करीता ब- सार्वजनिक सुरक्षीतता अग्निशमन विभाग मधील क्र.१२ चे लेखाशिर्षा मध्ये ठेका या शब्दा ऐवजी मानधन हा शब्द वापरून मानधन पध्दतीने फायर सब ऑफीसर फायरमन, वाहन चालक असे लेखाशिर्ष करण्यात यावे.

अंदाजपत्रकाच्या प्रती छापून घेवुन अहमदनगर महानगरपालिका सदस्यांना देण्यांत याव्यात खर्च मंजूर.

वरीलप्रमाणे सुचविलेल्या दुरूस्त्या शिफारसीसह सन २०१६-२०१७ सालचे बाबवार अंदाजपत्रक महानगरपालिकेच्या म.न.पा.शिक्षण विभागाच्या शेअरसह मा.महानगरपालिका सभे पुढे सादर.

ही अर्थसंकल्पावर शिफारशी करण्याकरीताची सभा असल्याने या सभेचे इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता या सभेतील ठरावानुसार कार्यवाही करण्यात यावी.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री.श्रीपाद छिंदम सही /-

अनुमोदक :- मा.सौ.छाया तिवारी सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-<br>(गणेश पुंडलिक भोसले)<br>सभापती,<br>स्थायी समिती,<br>अहमदनगर महानगरपालिका.

| | |
|---|---|
| **अहमदनगर महानगरपालिका अहमदनगर.** | |
| **मा. स्थायी समितीने मंजूर केलेला सन २०१५-२०१६चा अर्थसंकल्प (आकडे लाखात)** | |
| **सुरवातीची शिल्लक (दि.१/०४/२०१५)........................................** | **१२३२.६४** |
| **एकुण जमा..............................................................................** | **४१७३८.७७** |
| **सुरवातीचे शिलकेसह एकुण जमा................................................** | **४२९७१.४१** |
| **एकुण खर्च...........................................................................** | **४२१०७.८६** |
| **अखेरची अंदाजे शिल्लक (दि. ३१/३/२०१६)..................................** | **८६३.५५** |

| अ.नं. | **लेखाशिर्ष (जमा बाजू)सन १५-१६** | मा. आयुक्त यांनी सुचविलेली केलेली तरतुद | मा. स्थायी समितीने केलेला बदल | | मा.स्थायी समिती सभेने मंजूर केलेली तरतुद |
|---|---|---|---|---|---|
| | | | वाढ | घट | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | नाविन्यपूर्ण योजना अनुदान (ब्लड बॅक ) | ०.०० | ७५.०० | -- | ७५.०० |
| २ | रस्ता रूंदीकरणामुळे बाधीत होणा-या पाईप लाईन स्थलांतरीत/नव्याने करणे | ०.०० | १३२.०० | -- | १३२.०० |
| ३ | अमृत योजना - शहर भुयारी गटर योजना मनपा हिस्सा/ कर्ज | ०.०० | ३००.०० | -- | ३००.०० |
| | | ०.०० | ५०७.०० | ०.०० | ५०७.०० |

| अ.नं. | **लेखाशिर्ष (खर्च बाजू) सन १५-१६** | मा.आयुक्त यांनी सुचविलेली केलेली तरतूद | मा. स्थायी सभेने केलेला बदल | | मा.स्थायी समिती सभेने मंजूर केलेली तरतुद |
|---|---|---|---|---|---|
| | | | वाढ | घट | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | अमृत योजना - शहर भुयारी गटर योजना मनपा हिस्सा/ कर्ज | ०.०० | ३००.०० | -- | ३००.०० |
| २ | नाविन्यपूर्ण योजना अनुदान (ब्लड बॅक ) | ०.०० | ७५.०० | -- | ७५.०० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३ | रस्ता रूंदीकरणामुळे बाधीत होणा-या पाईप लाईन स्थलांतरीत/नव्याने करणे | ०.०० | १३२.०० | -- | १३२.०० |
| ४ | गुच्छ,हार,फुले,खरेदी | ३.५० | २.०० | -- | ५.५० |
| ५ | नविन इमारती | १.०० | १.०० | -- | २.०० |
| ६ | प्रभाग समिती क्र.१ | ४.०० | १.०० | -- | ५.०० |
| ७ | प्रभाग समिती क्र.२ | ४.०० | १.०० | -- | ५.०० |
| ८ | प्रभाग समिती क्र.३ | ४.०० | १.०० | -- | ५.०० |
| ९ | प्रभाग समिती क्र.४ | ४.०० | १.०० | -- | ५.०० |
| | | २०.५० | ५१४.०० | ०.०० | ५३४.५० |

सही/-
सभापती,
स्थायी समिती,
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका अहमदनगर.**

**मा. स्थायी सभेने मंजूर केलेला सन २०१६-२०१७चा अर्थसंकल्प (आकडे लाखात)**

**सुरवातीची शिल्लक (दि.१/०४/२०१६)........................................८६३.५५**

**एकुण जमा....................................................................७४४६५.४३**

**सुरवातीचे शिलकेसह एकुण जमा.............................................७५३२८.९८**

**एकुण खर्च....................................................................७४७३८.३५**

**अखेरची अंदाजे शिल्लक (दि. ३१/३/२०१७).............................. ५९०.६३**

| अ.नं. | **लेखाशिर्ष (जमा बाजू) सन १६-१७** | मा.आयुक्त यांनी सुचविलेली केलेली तरतूद | मा. स्थायी सभेने केलेले बदल वाढ | घट | मा.स्थायी समिती सभेने मंजूर केलेली तरतुद |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | सर्वसाधारण कर | ६०००.०० | ९००.०० | | ६९००.०० |
| २ | अग्नीशमन कर | १०.०० | | १०.०० | ०० |
| ३ | नळधारकाकडून जमा पाणीपट्टी | ३२५०.०० | | ७५०.०० | २५००.०० |
| ४ | पे आणि पार्कपासून उत्पन्न | ०.०५ | ९.९५ | | १०.०० |
| ५ | मोबाईल टॉवर दंडात्मक कारवाईचे उत्पन्न | १५५.०० | १००.०० | | २५५.०० |
| ६ | १२वा/१३वा/१४वा वित्त आयोग निधी | १०००.०० | १०००.०० | | २०००.०० |
| ७ | नाविन्यपूर्ण योजना अनुदान (ब्लड बॅक) | ०.०० | ७५.०० | | ७५.०० |
| ८ | रस्ता रूंदीकरणामुळे बाधीत होणा-या पाईप लाईन स्थलांतरीत/नव्याने करणे | ०.०० | १३२.०० | | १३२.०० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ९ | घनकचरा प्रक्रिया व विल्हेवाट अनुदान | १००.०० | १५०.०० | | २५०.०० |
| १० | अनाधिकृत बांधकाम नियमानुकूल करणे | २५०.०० | ५०.०० | | ३००.०० |
| ११ | रस्ता कर | ३६४.४३ | ७.०० | | ३७१.४३ |
| १२ | घनकचरा व्यवस्थापन- सेवाकर | ११६२.९४ | २४.०० | | ११८६.९४ |
| १३ | ड्रेनेज कर | ३२३.०० | १४.०० | | ३३७.०० |
| १४ | मललाभ कर | ७७.०० | ७.०० | | ८४.०० |
| १५ | जललाभ कर | ७७.०० | ७.०० | | ८४.०० |
| १६ | मुंबई नर्सिग होम ॲक्ट फी | १०.०० | १.०० | | ११.०० |
| १७ | गाळा भाडे | १६७.२० | ३०.०० | | १९७.२० |
| १८ | गाळे हस्तांतरण फी | ६५.०० | २०.०० | | ८५.०० |
| १९ | जाहिरात बोर्ड जमा भाडे | ८.२५ | ५०.०० | | ५८.२५ |
| २० | गॅन्ट्रीज रॉयल्टी | ०.०० | २५.०० | | २५.०० |
| २१ | मनपा शाळे भाडेपासून उत्पन्न | ५०.०० | २५.०० | | ७५.०० |
| २२ | विनापरवाना रस्ते,ड्रेनेज व पाण्याची लाईन फोडणे फी | ०.०० | ३०.०० | | ३०.०० |
| २३ | मालमत्ता नांव नोंदणी फी | ४००.०० | ५०.०० | | ४५०.०० |
| | | १३४६९.८७ | २७०६.९५ | ७६०.०० | १५४१६.८२ |

| अ.नं. | लेखाशिर्ष (खर्च बाजू) सन १६-१७ | मा.आयुक्त यांनी सुचविलेली केलेली तरतूद | मा. स्थायी सभेने केलेले बदल | | मा.स्थायी समिती सभेने मंजूर केलेली तरतुद |
|---|---|---|---|---|---|
| | | | वाढ | घट | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | रस्ते दुरूस्ती (डांबरीकरण ५० लाख, सिमेंट रस्ते २०लाख,खडीचे रस्ते १० लाख) | ७०.०० | १०.०० | -- | ८०.०० |
| २ | पुल बांधेणे व दुरूस्ती | ३.७५ | १७१.२५ | | १७५.०० |
| ३ | रस्ते खडीकरण | ५.०० | ५.०० | -- | १०.०० |
| ४ | रस्ते खडीकरण व नुतनीकरण | ७.०० | ३.०० | | १०.०० |
| ५ | नविन इमारती | ३०.०० | २०.०० | -- | ५०.०० |
| ६ | प्रभाग समिती क्र.१ | ४.०० | ६.०० | -- | १०.०० |
| ७ | प्रभाग समिती क्र.२ | ४.०० | ६.०० | -- | १०.०० |
| ८ | प्रभाग समिती क्र.३ | ४.०० | ६.०० | -- | १०.०० |
| ९ | प्रभाग समिती क्र.४ | ४.०० | ६.०० | -- | १०.०० |
| १० | महापौर शहर विकास निधी | ०.०० | २००.०० | | २००.०० |
| ११ | उपमहापौर शहर विकास निधी | ०.०० | ५०.०० | | ५०.०० |
| १२ | सभापती स्थायी समिती शहर विकास निधी | ०.०० | ५०.०० | -- | ५०.०० |
| १३ | सभापती,महिला व बाल कल्याण समिती शहर विकास निधी | ०.०० | १५.०० | -- | १५.०० |
| १४ | उपसभापती,महिला व बाल कल्याण समिती शहर विकास निधी | ०.०० | १०.०० | -- | १०.०० |
| १५ | डॉ.बाबासाहेब आंबेडकर शतकोत्तर रौप्यमहोत्सवी वर्ष निमित्त उपक्रम राबविणे | ०.०० | १०.०० | -- | १०.०० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १६ | डॉ.बाबासाहेब आंबेडकर पूर्णाकृती पुतळा उभारणे व सुशोभिकरण करणे | ०.०१ | ९.९९ | -- | १०.०० |
| १७ | महात्मा ज्योतिबा फुले पुर्णाकृती पुतळा उभारणे व सुशोभिकरण करणे | ०.०१ | ९.९९ | -- | १०.०० |
| १८ | कै.बा.दे.दवाखाना नुतनीकरण करणे | ०.०१ | ९.९९ | -- | १०.०० |
| १९ | बुरूडगांव रोड व केडगांव या उपनगरामध्ये उद्यान विकसीत करणे (प्रत्येकी २५ लक्ष रूपये) | ३०.०० | २०.०० | -- | ५०.०० |
| २० | सारसनगर,बोल्हेगांव परिसर,कॉटेज कॉर्नरजवळ,मुकंदनगर(प्रत्येकी १२.५० लाख) व कल्याण रोड येथील नालेगांव स.नं.३३/१,३४ येथे (२० लाख)नालेगांव स.नं.५/२ संभाजीनगर येथे (१० लाख) उद्यान विकसीत करणे. | ६०.०० | २०.०० | -- | ८०.०० |
| २१ | प्रमुख चौकात सी.सी.टि.व्ही.कॅमेरे बसविणे | ०.०० | १०.०० | -- | १०.०० |
| २२ | पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर स्मारक भिस्तबाग परिसर करणे. | १.०० | ९.०० | -- | १०.०० |
| २३ | १२वा/१३वा/१४वा वित्त आयोग निधी | १०००.०० | १०००.०० | -- | २०००.०० |
| २४ | घनकचरा प्रक्रिया व विल्हेवाट अनुदान | १००.०० | १५०.०० | -- | २५०.०० |
| २५ | घनकचरा प्रक्रिया व विल्हेवाट मनपा हिस्सा | १००.०० | १५०.०० | -- | २५०.०० |
| २६ | नाविन्यपूर्ण योजना अनुदान (ब्लड बॅक) | ०.०० | ७५.०० | -- | ७५.०० |
| २७ | मलनिःस्सारण केंद्र उभारणे | ०.०० | २००.०० | | २००.०० |
| २८ | आपत्कालीन व्यवस्थापन खर्च (नाल्या,पाईप लाईन दुरूस्ती,इ.) | १०.०० | ९०.०० | | १००.०० |
| २९ | रस्ता रूंदीकरणामुळे बाधीत होणा-या पाईप लाईन स्थलांतरीत /नव्याने करणे | ४०.०० | ९२.०० | | १३२.०० |
| ३० | वेडयांचा,कुष्ठरोगी यांचा पोषणाचा खर्च | १.०० | ९.०० | | १०.०० |
| ३१ | थकीत देयके अदा करणे | २५५०.०० | | ४५०.०० | २१००.०० |
| ३२ | सिटी सर्व्हे - सावेडी गावठाण | ३०.०० | | २७.०० | ३.०० |
| ३३ | वॉर्ड विकास निधी | ०.०० | १८३.०० | | १८३.०० |
| ३४ | सामाजिक संस्थांना देणगी | ४.०० | १.५० | | ५.५० |
| ३५ | आपत्कालीन व्यवस्थापन खर्च (बांधकाम) | ०.०० | १०.०० | | १०.०० |
| ३६ | प्र.क्र.३० बुरूडगांव रोड श्रीरामनगर अंतर्गत रस्ते कॉक्रीटीकरण करणे | ०.०० | २०.०० | | २०.०० |
| ३७ | बुरूडगांव रोड माडगे मळा अंतर्गत ड्रेनेज लाईन व रस्ते मजबुतीकरणासह डांबरीकरण करणे | ०.०० | २५.०० | | २५.०० |
| ३६ | गुच्छ,हार,फुले खरेदी | ३.५० | २.०० | | ५.५० |
| | | ४०६१.२८ | २६६४.७२ | ४७७.०० | ६२४९.०० |

सही/-
सभापती,
स्थायी समिती,
अहमदनगर महानगरपालिका.

**चर्चा :-**

**मा.श्री.कैलास गिरवले :-** एवढया महत्वाच्या विषयाचे गांभीर्य सदस्यांना नसेल तर या एवढे दुर्दैव नाही. कोरम साठी सभा १५ मिनीटांसाठी तहकूब करावी.

**मा.श्री.शेख नजीर अहमद :-** गिरवले मामांनी जी सूचना मांडली त्यास माझे अनुमोदन.

**मा.महापौर साहेब :-** १५ मिनीटांसाठी सभा तहकूब करण्यात येत आहे.

सभा पून्हा सकाळी ११.३० वाजता सुरु.

**मा.श्री.कैलास गिरवले :-** सन्माननीय आयुक्त साहेबांनी सभेस उपस्थीत राहायला पाहीजे आयुक्त साहेब का आले नाही तर याबाबत खुलासा करावा.

**मा.अतिरिक्त आयुक्त श्री.विलास वालगुडे :-** आजच्या सभेसाठी दिनांक २८/०३/२०१६ रोजीच्या पत्रान्वये सभेत मला प्राधिकृत केलेले आहे. त्यानुसार मी उपस्थित आहे.

**मा.श्री.कैलास गिरवले :-** प्राधिकृत करायला त्यास मान्यता घ्यावी लागते अशी माझी माहिती आहे. ती घेतली का परवानगी घेतलेली आहे का.

**नगरसचिव श्री.मिलींद वैद्य :-** मा.स्थायी समितीकडे अशा प्रकारचा प्रस्ताव विचारार्थ आलेला नाही.

**मा.श्री.कैलास गिरवले :-** यावर गांभीर्याने विचार होणे अभिप्रेत आहे. प्राधिकृत केलेले जर अधिकृत नसतील तर त्यांनी त्या ठिकाणी बसू नये. आयुक्त साहेब जर याठिकाणी उपस्थित नसतील तर येथे होणा-या चर्चेला काय अर्थ राहणार आहे. आमच्या दृष्टीने ते अधिकृत नाही.

**मा.महापौर साहेब :-** मा.सभापतींनी सभेसमोर अंदाजपत्रक सादर करावे.

**मा.श्री.कैलास गिरवले :-** आज सगळयात महत्वाचा विषय आहे. कॅफो सुध्दा हजर नाही. कॅफोंनी रजा मागणी केली ती आयुक्तांनी नामंजूर करुन स्वतः अनूपस्थीत आहेत.

**मा.श्री.बाबासाहेब वाकळे :-** सलग ३ सभांना आयुक्त साहेब गैरहजर आहे.

**मा.श्री.कैलास गिरवले :-** आयुक्तांवर अविश्वास ठराव करा. आयुक्तांच्या दालनात कूलूप लावून टाका. त्यांना येथे येण्यास मज्जाव करा.

**मा.महापौर साहेब :-** जर खाली दालनात आले असतील तर त्यांना बोलावण्यांत येईल.

**मा.श्री.दिप चव्हाण :-** गिरवले साहेबांनी सांविधानिक विचारणा केली. आयुक्तांनी कुठल्या सेक्शनने आपणांस प्राधिकृत केले आहे. आयुक्तांनी ६७ कलम नुसार जर प्राधिकृत केले हे जर प्रशासनाला सांगता येत नसेल तर गंभीर बाब आहे. एका सदस्याने मत मांडले ३ सभेस जर सदस्य गैरहजर राहिले तर त्यांचे सदस्यत्व रद्द होते मग याचे काय ?

**मा.महापौर साहेब :-** मा.आयुक्तांना खाली बोलवायला गेले येतील. सभा चालू करा.

**मा.श्री.कैलास गिरवले :-** भोसले साहेब हा स्थायी समितीचा अपमान आहे. खाली ते उपस्थित आहे. तुम्ही काय निर्णय घेणार ते सांगा.

**मा.श्री.गणेश भोसले :-** स्थायी ला त्यांनी कळवायला पाहीजे.

**मा.श्री.दिप चव्हाण :-** हे जे बजेट सादर केले ते कोणी सादर केले. सभागृहाचा एवढा अपमान करावा का.

**मा.श्री.गणेश भोसले :-** आयुक्तांनी सादर केले.

**मा.महापौर साहेब :-** चालू करा.

**मा.श्री.योगीराज गाडे :-** आयुक्त जर सभेस उपस्थीत नसतील तर या सभेस काही महत्व नाही.

**मा.श्री.किशोर डागवाले :-** सभागृहाचा अपमान आहे. सगळे बाहेर चला.

सदस्यांचे सभागृहातून सभात्याग (सकाळी ११.४५ वाजता)

**मा.महापौर साहेब :-** मा.सदस्य जे सभागृहातून बाहेर गेले त्यांनी सभागृहात येवून बसावे. (दुपारी १२.०० वा) सदस्यांची ही भावना दुखावली गेली त्याबाबत मा.प्रधानसचिव, नगरविकास विभाग यांचेकडे त्यांच्याबाबत तक्रार कळविण्यांत येईल. आयुक्तांची २ सभेस अनूपस्थीती व सभेच्या कामकाजा बाबत त्यांना कळविण्यांत येईल तसेच अति.आयुक्त यांना आज आयुक्तांचा दर्जा प्राप्त आहे तरी त्यांनी सभेसाठी आयुक्त या नात्याने कामकाज करावे.

**मा.महापौर साहेब :-** काही सदस्य बाहेर गेले. त्यावेळी त्यांना आत येण्यास सांगण्यात आले. त्यावेळी सदस्यांच्या भावना विचारात घेता सभा कामकाजा बाबत वारंवार मुद्दा उपस्थित केला आहे. आयुक्तांच्या अनूपस्थितीबाबत मा.प्रधान सचिव यांना अहवाल पाठविण्यात येईल.

**मा.महापौर साहेब :-** मा.सभापती कामकाज सुरु करणेत यावे.

**मा.श्री.गणेश भोसले :-** यांनी महासभेसमोर त्यांचे मनोगत वाचन केले.

मा.स्थायी समितीने दर वाढीस विरोध केला व अनधिकृत नळ कनेक्शन शोध मोहीम घेवून उत्पन्न वाढ सुचविले आहे. पार्किंग साठी जागा देवून उत्पन्न वाढ सुचविली आहे. तसेच जाहिरात बोर्ड जागा भाडे यापासून उत्पन्न वाढ सुचविलेली आहे. कुष्ठरोगी यांना मदत म्हणून प्रतिमहिना १ हजार सामाजीक भावनेतुन देण्याची शिफारस अर्थसंकल्पात केली आहे. वृक्षगणनेची शिफारस केली आहे. नगरसेवकांनी सुध्दा आपली कल्पना सुचवावी महानगरपालिकेच्या पिंपळगांव येथील जागेत पर्यटन केंद्र विकसीत करणे बाबत प्रमुख चौकात CCTV बसविणेसाठी तरतुद केली आहे. पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांचे स्मारक , महात्मा फुले स्मारक, प्रत्येक झोनमधील २ रस्ते असे ८ रस्ते घेवून त्यातून १ चिठ्ठी काढुन एक मॉडेल रस्ता विकसीत करावयाचा निर्णय स्थायी समितीने घेतला आहे. उपायुक्त चारठाणकर यांनी ही संकल्पना आमच्या समोर मांडली व आम्ही ती स्विकारली. त्याची जबाबदारीही त्यांनी घेतली आहे.

**नगरसचिव श्री.मिलींद वैद्य :-** आत्ताच मा.सभापती यांनी मनोगत वाचले. मी सभापतींना विनंती करतो की, त्यांनी मा.महापौर साहेब यांचेकडेस अंदाजपत्रक सादर करावे.

अंदाजपत्रक सादर केले.

**मा.सौ.मालनताई ढोणे :-** सचिव बजेट किती कोटीचे आहे.

**नगरसचिव श्री.मिलींद वैद्य :-** याबाबत लेखा विभाग माहिती देतील.

**मा.श्री.कुमार वाकळे :-** अंदाजपत्रकाचा अभ्यास करण्यासाठी आजचा दिवस वेळ देण्यात यावी.

**मा.श्री.दिप चव्हाण :-** अभ्यासाला एक दिवस कमी पडणार आहे. मा.महापौरांना विनंती कमीत कमी किमान अभ्यासासाठी २ दिवस देण्यात यावेत.

**मा.महापौर साहेब :-** मुळातच लेखा विभागाकडून अंदाजपत्रक स्थायी समितीकडे सादर करण्यास झालेल्या विलंबामुळे जास्त दिवस देता येणार नाही.उर्वरीत दिवस विचारात घेता जास्त अवधी देता येणार नाही.

**मा.श्री.शेख नजीर अहमद :-** मा.महापौर साहेब आपणाला अधिकार आहेत आपण तहकुब होणा-या सभेची तारीख व वेळ जाहीर करा.

**मा.महापौर साहेब :-** आज रोजीची सभा तहकूब करण्यात येत असून तहकूब सभा पुन्हा उद्या दिनांक ३०/०३/२०१६ रोजी सकाळी ११.०० वाजता सुरु होईल.

**दिनांक ३०/०३/२०१६ रोजी सकाळी ११.०० वाजता अर्थसंकल्पीय सभा पुढे सुरु.**

**मा.महापौर साहेब :-** तहकुब सभा पुढे सुरु करण्यांत यावी.

**मा.श्री.संपत बारस्कर :-** पेपरला बातमी आली की कायनेटीकचे पाणी तोडले निकम साहेब माहिती द्या.

**मेकॅनिकल इंजिनियर श्री.निकम :-** दरवर्षी पाणी कमी असल्याने व लेव्हल मिळत नाही . दरवर्षी करीत असतो तसेच या वर्षी केले.

**मा.श्री.संपत बारस्कर :-** पण त्यांना पाणीपुरवठा करावा असे आमचे म्हणणे आहे.

**मा.श्री.शेख नजीर :-** त्यांचे कनेक्शन तोडले आहे.

**मेकॅनिकल इंजिनियर श्री.निकम :-** ते टँकरने भरतात.

**मा.श्री.किशोर डागवाले :-** महानगरपालिकेती वरील अधिकारी कसे आपल्या ज्युनियरना वागणूक देतात ते पहा. इलेक्ट्रीक मध्ये तारु नावाचा कर्मचारी आहे. इलेक्ट्रीकचे काम करणे अवघड आहे. त्यांना अनेक प्रकारे अपमानकारक वागणूक दिली आहे. तो रात्री रेल्वे स्टेशनला गेला होता याबाबत युनियन पण भेटणार आहे.

**मा.महापौर साहेब :-** युनियन कर्मचारी व अधिकारी यांची सभेनंतर दालनात बैठक घेतली जाईल. श्री.सावळे साहेब खुलासा करा.

**इलेक्ट्रीक विभाग प्रमुख श्री.सावळे :-** श्री.तारु यांचे निवेदन मी वाचले.

**मा.श्री.किशोर डागवाले :-** जर युनियनचे कर्मचारी पोहोचले नसते तर त्यांनी आत्महत्या केली असती.

**मा.श्री.संपत बारस्कर :-** अशा प्रकारे हरेसमेंट केल्यास काम करायला कोणताही अधिकारी व कर्मचारी तयार होणार नाही.

**मा.महापौर साहेब :-** कर्मचा-याला अशी वागणूक का दिली जाते.

**मा.श्री.किशोर डागवाले :-** कोणालाही हॅरेसमेंट करु नका. कामगारांना का त्रास देता.

**मा.महापौर साहेब :-** माझे दालनात बोलावून समन्वय करुन दिला जाईल.

**मा.श्री.शेख नजीर :-** माझ्या वॉर्ड मध्ये मी स्वतः पैसे देवून साहित्य आणतो.

**मा.सौ.मालनताई ढोणे :-** अशा प्रकारे कोणत्याही कर्मचा-याला आत्महत्या करायला लागू नये. ही सर्व चर्चा सभागृहाला समजू द्या.

**मा.महापौर साहेब :-** चर्चा थांबवावी. माझे दालनात बैठक घेतली जाईल.

**मा.श्री.किशोर डागवाले :-** सभागृहात बोलवणे योग्य नाही दालनात बोलवा.

**मा.श्री.स्वप्नील शिंदे :-** किती पोल आहेत.

**इलेक्ट्रीक सुपरवायझर श्री.सावळे :-** ३३ ते ३४ .

**मा.श्री.स्वप्नील शिंदे :-** किती फिटींग एलईडी आहेत.

**मा.महापौर साहेब :-** त्यांना लेखी माहिती द्या.

**मा.श्री.बाळासाहेब बोराटे :-** एकुण किती एलईडी बसवले. बील किती दिले.

**इलेक्ट्रीक सुपरवायझर श्री.सावळे :-** रु.३ कोटी ३० लाख बील अंदाजपत्रकीय तरतुद होती. ३.५० कोटी बिल दिले. एलईडी १६०० फिटींग बसवल्या आहेत. त्यांची २० टक्के रक्कम राखून ठेवली आहे.

**मा.महापौर साहेब :-** आत जे प्रश्न सदस्यांनी मांडले त्या सर्व बाबत प्रशासनाने संबंधीताना लेखी माहिती द्यावी.

**मा.श्री.दिप चव्हाण :-** बजेट मा.आयुक्तांनी सुचविलेले आहे. मा.आयुक्त जाताना अति.आयुक्तांची हंगामी आयुक्त म्हणुन नियुक्ती केली आहे का.

**मा.अति.आयुक्त श्री.विलास वालगुडे :-** आयुक्तांच्या अनुपस्थितीत अतिरिक्त आयुक्त काम करतील अशी पुर्वीच्या आयुक्तांची स्टॅंडींग ऑर्डर आहे.

**मा.महापौर साहेब :-** मा.आयुक्त यांनी शासनाला त्याबाबत कळविले आहे.

**मा.सौ.दिपाली बारस्कर :-** मागच्या सभेत माझ्या वार्ड मधील रस्त्याच्या रखडलेल्या कामाचा विषय झाला त्यावर ठेकेदाराला कळवले ठेकेदाराचा माणूस आला. त्याने ३०/०३/२०१६ ला काम सुरु करु असे सांगीतले पण सुरु केले नाही.

**ज्यु.इंजिनियर श्री.पारखे :-** काम डांबर नसल्याने उद्या सुरु होणार आहे.

**मा.महापौर साहेब :-** अंदाजपत्रक वाचन सुरू करावे.

**मा.सौ.मालनताई ढोणे :-** हा आकडा सांगीतला हा कॅशबुकशी जुळणारा आहे का.

**मुख्यलेखाधिकारी श्री.विसपुते :-** हा सन २०१६-२०१७ चा अंदाजपत्रक आहे. मा.स्थायी समितीने केलेले १ ते ५ प्रस्ताव व ठराव वाचले. त्यानंतर पान नंबर २९ वरील शिफारशी वाचन सुरु केले. नंतर पान क्रमांक ३० वरील शिफारशी वाचन सुरु केले. नंतर पान नंबर ३१ वरील शिफारशी वाचन सुरु केले. पान नंबर ३२ अखेर पर्यंत वाचन पूर्ण केले.

**मा.श्री.बाळासाहेब बोराटे :-** सन २०१६-२०१७ चे अर्थसंकल्प सादर करतांना पान नंबर ७ वरील नागरिकांची पाणीपट्टी वाढवू नये. व्यापारी औद्योगीक वाढवल्यास चालेल. पान नंबर १४ वरील दवाखाने बंद करण्याचा प्रस्तावास मी संमती देत नाही. ती दवाखाने साध्या आजारांचे आहेत. ते सुधारावेत हे बंद न करता नविन दवाखाने सुरु करावेत. तसेच कुष्ठरोगी अपंग व वेडे यांचा सर्व्हे केला का ?

**वैद्यकीय आरोग्य अधिकारी श्री.राजुरकर :-** महानगरपालिका अधिकारी व कर्मचारी व्दारे सेवा उपलब्ध करुन देत आहे. कुष्ठरोगी संघटनेने अर्ज केला होता. इतर महानगरपालिकेची माहिती घेतली. त्यानुसार प्रस्ताव सादर केला आहे. हा लाभार्थी पात्रता BPL असावा.

**मा.श्री.बाळासाहेब बोराटे :-** हा विषय आहे या तरतुदीत वाढ करुन उपचाराकरीता ठेवा तसेच विरोधी पक्ष नेता व सभागृह नेत्यांना २५ लाख प्रत्येकी तरतुद द्या. पान ३५ वर नियम आहे. संभाजी महाराज पुतळयाकरीता तरतुद १० लाख केली. शासन आपल्याला परवानगी देत नाही. सन २०१३-२०१४ पासून असेच चालू आहे. ती विनाकारण तरतुद ठेवू नये. तसेच मोकाट कुत्रे पकडणे करीता ५० लाख तरतुद ठेवली ही एवढी कशासाठी आहे.

**वैद्यकीय आरोग्य अधिकारी श्री.राजुरकर :-** आधीच ठेकेदार नरसाळे यांनी बिल मिळावे म्हणुन कोर्टात केस केली त्यावर बिल द्यावे असा आदेश झाला.

**मा.श्री.बाळासाहेब बोराटे :-** जर कुत्रे धरुन नेले नाहीत. निर्बिजीकरण केले नाहीतर पैसे कशासाठी द्यावे. तसेच प्रत्यक्षात घरपट्टी किती वसूल होईल.

**अतिरिक्त आयुक्त श्री.विलास वालगुडे :-** ३८ कोटी ८१ लाख आजपर्यंत वसूल झालेला आहे.

**मा.श्री.बाळासाहेब बोराटे :-** सन २०१६-२०१७ मध्ये किती वसूल होईल.

**मार्केट विभाग प्रमुख श्री.तांबोळी :-** रक्कम रुपये ८८ कोटी वसूल होईल.

**मा.श्री.बाळासाहेब बोराटे :-** महसुली उत्पन्न २८८ कोटी दाखवले ते होणार का कॅफो सांगा.

**मुख्यलेखाधिकारी श्री.विसपुते :-** पान नंबर १०० (यात तपशील आहे तो वाचला)

**मा.श्री.बाळासाहेब बोराटे :-** हे एवढे उत्पन्न होणार का. काय करणार. प्रत्यक्ष मिळणार आहे का.

**मुख्यलेखाधिकारी श्री.विसपुते :-** प्रत्येक विभाग प्रमुख याकरीता प्रयत्न करुन रक्कम गोळा करतील.

**मा.श्री.बाळासाहेब बोराटे :-** वसूल महसूल कमी रक्कमा दिसतात. त्याकमी का होतात ते कसे वाढवणार ते सांगा. शासनाच्या योजना बाबत बोलत नाही.

**मा.महापौर साहेब :-** ह्या रक्कमा वसुलीचे नियोजन कसे करणार ते उपायुक्त (कर) यांनी सांगा.

**मा.श्री.गणेश भोसले :-** प्रेक्षक गॅलरीत नागरीक कसेही उभे व बसले आहेत त्यांना व्यवस्थित बसण्यास सांगा.

**मा.महापौर साहेब :-** प्रेक्षक गॅलरीतील नागरिकांनी शिस्तीने बसावे.

**मा.श्रीमती.नसीम शेख :-** नाम संस्थेचे पदाधिकारी मनपास भेट देतील,त्यावेळी त्यांना महानगरपालिकेचे कर नागरीकांनी भरण्याचे दृष्टिने संदेश देण्याबाबत सांगावे.

**मा.महापौर साहेब :-** आपण त्यांना अवाहन करण्यांस सांगू.

**मा.उपायुक्त (कर) श्री.बेहेरे :-** मालमत्ता कर ४६ कोटी मागील वर्षी होती. यावर्षी ३८ कोटी होती. पण सन २०१६-२०१७ मध्ये जीआयएस मुळे उत्पन्न वाढणार आहे.

**मा.श्री.बाळासाहेब बोराटे :-** दाखवलेले आकडे व प्रत्यक्ष वसूल कमी झाली. त्यांनी प्रत्यक्ष बजेट दाखवावे.

**मा.उपायुक्त (कर) श्री.बेहेरे :-** जीआयएस मुळे मालमत्ता कर दुप्पट होवू शकेल.

**मा.श्री.कुमार वाकळे :-** तरतुदी वाढी करणे बाबत यादी वाचून दाखवली.

**मा.सौ.मालनताई ढोणे :-** अमरधाम कंम्पौंड वॉल करीता वेगळी तरतूद घ्यावी.अमरधामचे काम रखडले आहे.

**मा.महापौर साहेब :-** ४० कोटीच्या कामात घेतले त्याला अडचण नसती आली तर आतापर्यंत काम सुरु झाले असते.

**मा.श्री.अनिल शिंदे :-** फेज-२ काम झाल्यावर पुढील बजेट मध्ये प्रस्ताव ठेवावा. मी शिवसेना - भाजपाच्या वतीने विरोध करतो व पाणीपट्टी मध्ये कोणतीही वाढ करु नये असे सुचवतो.

**मा.श्री.कैलास गिरवले :-** महात्मा ज्योतीबा फुले जयंती पासुन ते डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीचा कार्यक्रमा करीता २५ लाख तरतूद करावी व दोन्ही पुतळया करीता २५ लाख तरतुद करावी.

**मा.श्री.संपत बारस्कर :-** पान नंबर ८० वॉर्ड निधी व स्वेच्छा निधी जे मागील वर्षी या हेडवर होत तेच यावर्षी ही झाले आहे. मागीलवर्षी सांगीतले गार्डन करु ते पैसे तसेच आहेत. पण गार्डन झाले नाही. खडीकरण रस्ते या नुसारच रक्कमा आहेत. आज बजेट ची सभा आहे. कीतीही बोला पण मुद्देसूद बोला. मॉडेलरस्ता निर्णय चांगला पण तो झाला पाहिजे. बजेट बनवणा-या अधिकारी गांर्भीर्याने घेतले नाही. त्या रकमा नुसत्याच पडून आहेत. त्याबाबत कधी अधिका-यांनी विचार केला का. हे गार्डन रस्ते, उपनगर विकास ही कामे होणारच आहेत असे अधिका-यांनी सांगीतले पाहिजे. तसा आदेश महापौर यांनी द्या. रोज या कामाकरीता स्वतंत्र खात्यावर पैसे टाका तयामुळे नगर विकासाच्या दिशेने जाईल.

**मा.महापौर साहेब :-** महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती बघता, आर्थीक नियोजन करावे. ज्या रस्त्याची अवस्था बिकट झाली ते त्वरीत करावेत.

**मा.श्री.अभय आगरकर :-** रुलिंग देतांना प्रथम आपण सर्वांचे ऐकुण घेतले पाहिजे. नगरमध्ये अनेक रस्ते बिकट आहेत. अशा रुलिंग मध्ये प्रतिबिंब दिसते. आपण तरुण कार्यक्षम आहात आपल्या ज्ञानाचे प्रतिबिंब दिसले पाहिजे. आपण सर्वांचे ऐकुण नंतरच रुलिंग द्यावे.

**मा.महापौर साहेब :-** प्रशासनाने पहाणी करुन हे बिकट अवस्थेचे रस्ते ठरवावेत.

**मा.श्री.अभय आगरकर :-** यात आपण सर्वांना समान न्याय समान संधी द्या. विकासातील अनुशेष भरुन काढा. सर्व भागाचा विकास समान झाला पाहिजे. मॉडेल रस्ते कोणते ते सांगा. जर आपण स्पेसीफीक तरतुद ठेवता तर बाकीचे रस्ते कोणते.

**मा.श्री.गणेश भोसले :-** कालच मी मॉडेल रस्त्याबाबत सांगीतले आपण १ मॉडेल रस्ता विकसीत करु. ४ प्रभागातील २ असे ८ रस्ते निवडू व चिठ्ठी काढू.

**डॉ.श्री.सागर बोरुडे :-** सध्या मंदीचा काळ आहे या परिस्थितीत व्यापारी व औद्योगिक पाणीपुरवठयात वाढ करण्यांत येवू नये. मोबाईल टॉवर वर किती कारवाई झाली व दंड किती आला माहिती द्या.

**नगररचनाकार श्री.पाटील :-** ११७ मोबाईल टॉवर विना परवाना आहेत. त्यांचेकडून हे उत्पन्न अपेक्षित आहे.

**मा.श्री.अनिल शिंदे :-** ११७ अनधिकृत हे मागीलवर्षीही सांगीतले पण आजपर्यत ही कारवाई झाली नाही.

**नगररचनाकार श्री.पाटील :-** मोबाईल टॉवर चे प्रस्ताव योग्य नसतात परिपूर्ण नसतात त्यामुळे परवानगी देता येत नाही.

**मा.श्री.बाळासाहेब बोराटे :-** हे उत्तर नाही होत. बेकायदेशीर बसवले तर कारवाई करा ना.

**मा.श्री.अनिल शिंदे :-** किती दिवसात कारवाई करणार.

**नगररचनाकार श्री.पाटील :-** २ - ३ महिन्यात.

**मा.महापौर साहेब :-** कारवाई काय करता ते दिसले पाहिजे ३० एप्रिल २०१६अखेर कारवाई करा.

**मा.श्री.अनिल शिंदे :-** याची माहिती पुढील मा.महासभेमध्ये विचारु ती त्यावेळी द्या.

**मा.श्री.उमेश कवडे :-** ७५० कोटीचे बजेट करतो पण ४० रुपयांची १ टयुब मिळत नाही. नगरसेवक स्वत: पैसे घालून कामे करतात. नगरसेवक निधी करीता स्वतंत्र खाते सुरु करा. व त्यात भरीव रक्कम द्या. मागील किती निधी खर्च झाला सांगा.

**मुख्यलेखाधिकारी श्री.विसपुते :-** पान नं.८० वॉर्ड विकास निधी ४३ लाख खर्च. स्वेच्छा निधी तरतूद ३.६४ कोटी. खर्च १.१६ लाख.

**मा.श्री.उमेश कवडे :-** स्वतंत्र तरतुद करा.

**मुख्यलेखाधिकारी श्री.विसपुते :-** आपण स्वतंत्र खाते सुरु करुन निधी जमा करणार आहोत.

**मा.श्री.विक्रम राठोड :-** लाईटचे जे ठेकेदार आहेत त्यांना किती पैसे दिले व किती राहिले. त्याची माहिती द्या. फोन केला तर सांगतात मटेरियल नाही.

**मा.महापौर साहेब :-** सप्लायर्सचे पैसे द्या. लाखाचे बिल थकले आहे. ते द्यायचे आहेत.प्रशासनाने नागरीकांच्या मुलभूत गरजा भागविण्याच्या जबाबतदारी कडे गांभिर्याने पाहीले पाहीजे.उत्पन्नाचे नवनवे स्त्रोत शोधले पाहिजे.

**इलेक्ट्रीक विभाग प्रमुख श्री.सावळे :-** ७० लाखाची बिले अकौंट विभागाकडे आहेत. मटेरियल आले आहे. १० लाखाचे मटेरीयल आले आहे. ३५० लाईटचे मटेरियल आले आहे.

**मा.सौ.मनिषा बारस्कर :-** पाण्याची ड्रेनेज लाईन घेतो. रस्ता खोदला तर बुजवण्याचे काम कोणाचे ठेकेदाराचे का नागरिकांचे.

**मेकॅनिकल इंजिनियर श्री.निकम :-** लाईनचे काम केले तर ठेकेदाराचे काम आहे.

**मा.सौ.मनिषा बारस्कर :-** माझ्या वॉर्डमध्ये खोदले ते बुजवले नाही.

**मा.श्री.दिलीप सातपुते :-** उन्हाळयाचे दिवस आहेत. केडगांवमध्ये ५-७ दिवसावर पाणी पुरवठा आला आहे. रविवार, गुरुवारचे पाणी का बंद केले.

**मेकॅनिकल इंजिनियर श्री.निकम :-** रुटीन प्रमाणे पाणी देतो पण ७-८ दिवसांपासुन एमएसईबी चा पुरवठा खंडीत होत आहे. त्यामुळे उपसा कमी होतो.

**मा.श्री.कैलास गिरवले :-** वॉलमन, इंजिनियर फोन बंद करतात. एकदम प्रेशर कमी होतो.

**मा.श्रीमती.नसीम शेख :-** तक्रार एकच आहे की इंजिनियर, वॉलमन मोबाईल फोन बंद ठेवतात. उध्दट उत्तरे देतात. त्यांची मिटींग घेवून ठरवा.

**मा.महापौर साहेब :-** जेथे खोदकाम होते त्याची पहाणी करुन रितसर परवानगी नसल्यास केअर टेकर, स्वच्छता निरीक्षक व प्रभाग समितीचे प्रभाग अधिकारी यांनी कारवाई करावी.

**मा.सौ.मालनताई ढोणे :-** उद्यान विकसीत निधी किती. पान क्रमांक २० दहा लक्ष तरतुद आहे. नविन उद्याने करणार कि जुने उद्याने दुरुस्ती करणार आजची स्थिती सांगा.

**उद्यान अधिक्षक श्री.गोयल :-** ५२ उद्याने आहेत. फक्त सिध्दीबाग उद्यानाची स्थिती खराब आहे. बाकीच्या उद्यानांची स्थिती बरी आहे. आज कर्मचारी नाहीत. पुर्वी १५२ कर्मचारी होते.

**मा.सौ.मालनताई ढोणे :-** कर्मचारी काम करतात का.

**उद्यान अधिक्षक श्री.गोयल :-** ५२ उद्यानांना कर्मचारी पुरत नाहीत.

**मा.सौ.मालनताई ढोणे :-** सिध्दीबागेत महिला रात्री ८.०० वाजेपर्यंत फिरतात. सकाळी ५.०० पासुन फिरतात तेथे सुरक्षितता नाही.

**मा.श्री.सुवेंद्र गांधी :-** कर्मचारी किती.

**मा.महापौर साहेब :-** उद्यानाबाबत आपण बीओटी तत्वावर देणे बाबत आदेश दिले आहेत. कार्यवाही चालू आहे.

**मा.श्री.उमेश कवडे :-** काल उप महापौरांनी आयुक्तसाहेबांना धार्मिक स्थळाच्या सर्व्हे बाबत निवेदन दिले आहे. त्याबाबत कार्यवाही करण्यास सांगा.

**मा.श्री.दिलीप सातपुते :-** आपण अधिकृत धार्मिक स्थळांचा सर्व्हे पुन्हा करण्याबाबत आयुक्त यांना सांगीतले आहे. पण आज पर्यंत पाहता आयुक्त आपले ऐकतील का.

**मा.श्री.सचिन जाधव :-** अनेक ऐतिहासीक स्थळे आहेत. ती डेव्हलप करायचे . त्याच्याजवळ बांधकाम परवानगी देणे बाबत काय कार्यवाही केली.

**श्री.बल्लाळ नगररचना विभाग :-** या बाबत विभागाशी पत्र व्यवहार केला आहे. ठराव केला आहे. त्याला वरिष्ठ पातळीवरुन प्रयत्न आवश्यक आहेत.

**मा.श्री.सचिन जाधव :-** निदान दुरुस्तीची परवानगी द्यावी.

**श्री.बल्लाळ नगररचना विभाग :-** डेव्हलपमेंट प्लॅन मधील रस्त्याची रुंदी पाहुन देता येवू शकते. तथापी या कार्यवाहीस एक महिना लागेल.

**मा.महापौर साहेब :-** एप्रील अखेर पर्यंत कार्यवाही करावी.

**मा.श्री.सचिन जाधव :-** महानगरपालिकेच्या प्रोसिजर्स आहेत. उदा- समाजमंदिर मंगलकार्यालये ही मान्यतेसाठी का पाठवत नाही. ते मंजूर होवून आले तर पुढच्या वर्षी तरी ते डेव्हलप करता येतील. उत्पन्न वाढेल.

**श्री.बल्लाळ नगररचना विभाग :-** असे करता येईल.

**मा.श्री.सचिन जाधव :-** किती काळ लागेल.

**मा.श्री.सचिन जाधव :-** आंबेडकर समाज मंदिर दुरुस्तीकरीता जास्तीत जास्त साधारण ८,९ ते १० लाख रुपयांची तरतुद करावी. सर्वात मोठे मटन मार्केट मंगलगेट येथे आहे. त्याची अवस्था वाईट आहे. मागे रहिवासी क्षेत्र आहे. तेथे डागडुजी केल्यास आरोग्याचाही प्रश्न मिटेल. तेथे तरतुद करा.

**मा.महापौर साहेब :-** दोन्ही साठी तरतुद करावी.

**मा.श्री.महेश तवले :-** लाईटची कामे मार्गी लावली असा उल्लेख आहे. पण ते केले नाही. उदा- डीएसपी चौक ते सनी हॉटेल.

**इलेक्ट्रीक विभाग श्री.सावळे :-** ठेकेदाराला अंतिम नोटीस दिली. मुदत संपली आहे. डिपॉझिट जप्त करुन काळया यादीत टाकण्याची व्यवस्था करीत आहोत.

**मा.महापौर साहेब :-** याबाबत सक्षम प्राधिकरणापुढे लवकरात लवकर रिपोर्ट ठेउन कार्यवाही करा.

**मा.श्री.महेश तवले :-** नित्यसेवा ते पेट्रोल पंप हा रस्ता दीड वर्षापुर्वी झाला तो खचला त्याची मुदत किती.

**श्री.पारखे इजिनियर :-** दोन वर्षापुर्वी झाला त्याचा रिपेअर रिअॅबीलीटी चा पिरीयड होता.

**मा.श्री.महेश तवले :-** १० दिवसापासुन माझे वॉर्डात घंटा गाडी नाही.

**मा.महापौर साहेब :-** गाडी उपलब्ध करुन द्यावी.

**मा.श्री.कैलास गिरवले :-** मी डॉ.आंबेडकर शाळेची विस्तारीत इमारत बांधणे करीता पत्र दिले होते. याकरीता त्वरीत बजेट मध्ये तरतुद करावी.

**मा.महापौर साहेब :-** विचार केला जाईल.

**मा.श्री.विपुल शेटीया :-** या सभेत बजेटच्या संबंधी विषय घ्या. फेज - २ चे काम आमच्या वॉर्ड मधील व इतर वॉर्डातील मार्गी लागले. नविन कनेक्शन नविन लाईनवर जोडले जाणार त्याचा खर्च नागरीकांनी करायचा का.

**मेकॅनिकल इंजिनियर श्री.निकम :-** ५० टक्के रक्कम महानगरपालिका व ५० टक्के रक्कम नागरीकां कडुन घेतली जाईल.

**मा.महापौर साहेब :-** श्री.शेटीया यांच्या सूचनेसह इतर पूर्ण झालेल्या प्रभागासाठी प्राथमीक तरतूद करावी.

**मा.श्री.बाळासाहेब बोराटे :-** आयुक्तांच्या मनोगतामध्ये नेहरुमार्केटचा मुद्दा आहे त्याची माहिती द्या.

**मा.श्री.योगीराज गाडे :-** साधूवासवानी कॉलनी पाईप लाईन आहे. कनेक्शन आहे. पाणी येत नाही. दुरुस्ती करणारे ठेकेदार काम करीत नाही. कारण बिले दिली गेली नाहीत.

**मा.महापौर साहेब :-** प्राधान्य क्रमात घेवून दुरुस्ती करा व बिलही द्या.

**मा.सौ.मालनताई ढोणे :-** मनोगतात वाताणुकूलीत नाट्यगृहाबाबत लिहीले. जुने पुर्वीचे नाट्यगृह खराब झाले आहे. उकिरडा झाला आहे. नविन सुरु होईल का. नविन वातानुकूलीत नाट्यगृहाचे स्वप्न होईल का पूर्ण.

**मा.महापौर साहेब :-** यापुर्वी तरतूद केली होती का. महिती असेल तर उत्तर द्या.

**मा.अति.आयुक्त श्री.विलास वालगुडे साहेब :-** पान नंबर ७७

**श्री.सातपुते, इंजिनियर :-** श्री.एन.डी.कुलकर्णी असतांना स्टेप्स बांधल्या होत्या. २५ लाखाचे अंदाजपत्रक होते. आपण फक्त स्टेप्स केल्या.

**मा.महापौर साहेब :-** तेथे नाटके होत नाहीत.

**श्री.सातपुते, इंजिनियर :-** तेथे स्टेजला छत करायचे आहे ते केले तर उपयोग होईल. ते ओपन थिएटर, वापरायचे.

**मा.श्री.बाळासाहेब बोराटे :-** नेहरु मार्केट माहिती द्या.

**श्री.मेहेत्रे, इंजिनियर :-** नेहरु मार्केट करीता नगररचना विभागाने मुल्यांकन काढले आहे. २ कोटी २८ लाख त्याचे बीओटी टेंडर काढीत आहोत.

**मा.श्री.बाळासाहेब बोराटे :-** २०१० चा ठराव सांगा.

**श्री.मेहेत्रे, इंजिनियर :-** २ कोटी प्रिमियम व ५० लाख चितळे रोड विकास करीता ---

**मा.श्री.बाळासाहेब बोराटे :-** मला सांगा बिल्डींग मेथड येथे वापरता येते का ही संकल्पना काय व कोणाची आहे.

**नगररचनाकार श्री.पाटील :-** नानावटीचे आहे.

**मा.श्री.बाळासाहेब बोराटे :-** १० कोटीची जागा २ कोटीला द्यायची का. बेहेरे साहेबांचा अभिप्राय वाचा. जर २०१० साठी ४ कोटी किंमत काढली तर २०१६ ला किंमत कमी होउ शकते का ?

**मा.श्री.गणेश भोसले :-** ते टेंडर किती वेळा री-कॉल झाले.

**श्री.मेहेत्रे, इंजिनियर :-** ५ ते ६ वेळा रि-कॉल झाले.

**मा.श्री.किशोर डागवाले :-** आपणठराव केला होता. की टेंडर ला प्रतिसाद मिळाला नाही. तर महानगरपालिकेने कर्ज घेवून बांधावे.

**मा.श्री.गणेश भोसले :-** आम्ही स्थायी समिती घेतली होती. प्रत्येक ५-६ वेळा ठराव किती रक्कमेचा झाला.

**श्री.मेहेत्रे, इंजिनियर :-** २ कोटी व ५० लाख चितळेरोड विकास निधी.

**मा.श्री.किशोर डागवाले :-** आम्ही बँकेचे कर्ज घेण्याकरीता ठराव केला होता.

**मा.श्री.बाळासाहेब बोराटे :-** छत्रपती शिवाजी महाराज मार्केट ३ कोटी ३६ लाख करीता दिली जागा.

**मा.श्री.गणेश भोसले :-** हा प्रिमियम आकडा कोणी ठरवला.

**मा.श्री.बाळासाहेब बोराटे :-** आज बजेट मध्ये तरतूद करा. कोणतीही बँक कर्ज देईल.

**मा.श्री.किशोर डागवाले :-** त्यामुळे जागा आपली राहील.

**मा.श्री.बाळासाहेब बोराटे :-** ही जागा बीओटी वर न देता कर्ज काढून डेव्हलप करा. जागा आपली राहील.

**मा.महापौर साहेब :-** हा विषय प्रलंबीत होता. निविदांना प्रतिसाद मिळाला नाही. त्यामुळे बीओटी वर मार्गी लागला. जर विकास होईल.

**मा.श्री.किशोर डागवाले :-** मोक्याची जागा आहे.

**मा.श्री.गणेश भोसले :-** आमचे म्हणणे तेच आहे. ही जागा किती दिवस पडून होती.

**मा.श्री.अनिल शिंदे :-** बँकेचे दर परवडणारे नाहीत. हुडको कडून कर्ज घ्या. हे काम महानगरपालिकेने करावे असे माझे मत आहे.

**मा.श्री.किशोर डागवाले :-** ६ वेळा निविदा काढल्या, एक प्रयत्न आपण का करु नये.

**मा.महापौर साहेब :-** ६ वेळा संधी दिली ती कमी आहे का .

**मा.श्री.बाळासाहेब बोराटे :-** महानगरपालिकेचे गॅरेज या सर्व जागेवर नाव कोणाचे आहे.

सि.स.नं.४७/७० ९ एकर हे महानगरपालिकेच्या ताब्यात क्षेत्र आहे. त्यावर महानगरपालिकेने सि.स.कडे अपिल केले निकाल आपल्या बाजूने लागला. नाव लावण्याचे काम चालू असतांना त्यांनी अपिल केले आहे. ताबा आपलाच आहे.

**मा.महापौर साहेब :-** या बाबत लक्ष घालावे.नगररचना विभागाने गांर्भियाने पहावे.

**मा.श्री.सुवेंद्र गांधी :-** पान नंबर ८१ वरील मुद्दा १३ मध्ये पिंपळगांव तलाव खर्च दाखवला १ हजार, पिंपळगांव पर्यटन करीता १ लाख असे ३-३ हेड का तयार केले.

**मुख्यलेखाधिकारी श्री.विसपुते :-** २ ठिकाणी टोकन तरतूद १-१ हजार केली. पर्यटन केंद्र विकासाकरीता ५० लाख रुपयांची तरतुद केली.

**मा.श्री.सुवेंद्र गांधी :-** तेथे काय करणार आहेत.

**मेकॅनिकल इंजिनियर श्री.निकम :-** पाणीपुरवठा विभागाची तरतूद - तलाव पुनरुज्जीवीत करायचा, गाळ काढायचा, जूना कॅनॉल सुरु करणे.

**मा.श्री.योगीराज गाडे :-** मा.शासनाने १ ते १५ मार्च पर्यंत सर्व ठिकाणी शासकीय बिल्डींग मध्ये स्वच्छता अभियान घेण्याचे पत्र दिले होते. आपण केले होते का. ही मोहिम आपण राबवली का. प्रेसला कळवले का.

**मा.महापौर साहेब :-** सर्व इमारती स्वच्छता करण्यात याव्यात.

**मा.श्री.योगीराज गाडे :-** वैयक्तीक स्वच्छता गृह बांधण्याचे फोटो वेबसाईट वर फोटो टाकले पाहीजे ते केले नाही. पुढच्या मिटींगला दाखवा ४०० फोटो दिसले पाहिजेत. शासनाकडून जे जी.आर.आदेश येतात ते नगरसेवकांना सांगत नाही.

**अति.आयुक्त श्री.विलास वालगुडे :-** मागील सभेत आपण याकरीता विषय घेतला होता. फोटो अपलोड करण्यात नेटची कनेक्टीव्हीटी अडचण होते.

**मा.कैलास गिरवले -** मा.शासनाचे अनेक परिपत्रके,शासन निर्णय येत असतात परंतू याची माहिती सभागृहाला मिळत नाही.त्यादृष्टिने सामान्य प्रशासन विभागाने असे प्रस्ताव मा.महासभेच्या माहिती साठी सादर करावेत.

**मा.महापौर साहेब :-** सहाय्यक आयुक्त यांनी असे प्रस्ताव मा.महासभेपुढे ठेवण्याच्या दृष्टिने कार्यवाही करावी.

**मा.सौ.मनिषा बारस्कर :-** माझ्या वॉर्ड मध्ये १७ नं शाळा आहे तेथे विद्यार्थी शिकतात त्या शाळेची दुरुस्ती पावसाळया पुर्वी करावी.

**मा.श्री.संजय घुले :-** घरपट्टी वसूल करतांना आपण ॲडव्हान्स घरपट्टी घेतो. त्यावर २% शास्ती लावतो. अशी शास्ती कोठे नाही. जे ३१ मार्च पर्यंत भरतील त्यांना शास्ती आकारु नका दुसरे असे की, आपल्याकडे प्रॉपर्टी वर नाव लावण्याच्या डिपार्टमेंटमध्ये २ कर्मचारी आहेत. ते गॅस सर्व्हेला आहेत. तेथे इतर कर्मचारी नेमा.

**अति.आयुक्त श्री.विलास वालगुडे :-** वैयक्तीक शौचालयाचे ६६ फोटो अपलोड केले आहेत.

**मा.उपायुक्त श्री.बेहेरे :-** अनुसूची मध्ये २०१२ मध्ये दुरुस्ती होउन पहिल्या ६ महिन्याच्या बिलावर १ जुलै पासुन शास्ती आकारावी हि तरतुद कायद्यात आहे. जून पर्यंत भरल्यास शास्ती लागत नाही. यावेळी आयुक्तांच्या आदेशात तरतुद नव्हती.

**मा.श्री.सचिन जाधव :-** शास्ती माफी सुरुवातीला देण्यांत येवू नये. त्याचा उपयोग होत नाही. शास्ती माफी शेवटच्या फेब्रुवारी-मार्च महिन्या मध्येच देण्यात यावी.

**मा.श्री.संजय घुले :-** मग ज्यांनी पट्टी शास्ती भरली आहे. त्यांचा उपयोग होईल का.

**मा.उपायुक्त श्री.बेहेरे :-** जर आयुक्तांचे निर्णयात दुरुस्ती केली तर करता येईल.

**मा.श्रीमती.नसीम शेख :-** मुकुंदनगर मध्ये ड्रेनेज पसरले होते. तसेच सीआयव्ही मध्ये झाले आहे. त्याची पहाणी करा. हिनापार्क मधील अतिक्रमण काढायचे आहे.

**अति.आयुक्त श्री.विलास वालगुडे :-** पोलीसांना पत्र दिले आहे. त्यांचा बंदोबस्त आला की कार्यवाही करण्यांत येईल.

**अतिक्रमण विभाग प्रमुख श्री.इथापे :-** अतिक्रमण काढण्याची कार्यवाही अंतीम टप्प्यात आहे. पोलीस बंदोबस्ता करीता पत्र दिले आहे.

**मा.श्रीमती.नसीम शेख :-** मी स्वतः बोलते पोलीस अधिक्षकांशी उद्या फोन करते.

**मा.श्री.संजय घुले :-** झोन नं.२ मध्ये तर माहिती सुविधा केंद्र आहे. तसेच झोन २ मध्ये महत्वाचे डिपार्टमेंट आहे तेथे सगळे कनेक्शन्स इनव्हर्टरला जोडले. लाईट नाही. इनव्हर्टर बंद झाल्यास काम बंद होते.

**मा.उपायुक्त श्री.बेहेरे :-** लाईट आहे पण लाईट गेले तर इनव्हर्टर वापरतात. त्या बॅटरी जुन्या आहेत त्या बंद पडतात.

**मा.डॉ.श्री.बोरुडे :-** गव्हाळे साहेबांचे मुद्याला माझे अनुमोदन आहे.

**मा.श्री.अनिल शिंदे :-** ज्या त्या प्रभागात मोबाईल कंपनी काम करतात. एमएसईबी पण खोदाई काम करतात. त्या कंपन्या महानगरपालिकेत पैसे भरतात. त्या पैशातुन त्याच प्रभागात कामे करावीत याकरीता स्वतंत्र खाते बँकेत ठेवले जावे.

**मा.महापौर साहेब :-** लेखी पत्र दिले आहे.बांधकाम व लेखा विभागाने जबाबदारीने काम केले आहे.

**मा.श्री.दिप चव्हाण :-** ११ वाजता सभा सुरु झाली त्यावर ३-४ तास बजेट वर चर्चा चांगली चालली आहे. मा.गणेश भोसले यांनी बजेट सादर केले. यापुर्वी १४-१५ चे बजेट मा.डागवाले यांनी मांडले. या दोन्ही मनोगतात मागील तरतुदी बाबत काही दिसत नाही. संकलीत कराबाबत सर्वसाधारण कर ६० कोटी चालू मागणी दाखवली. ऑफिस रिपोर्ट मध्ये ३४ कोटी दाखवले होते. ते ३८ कोटी आले. ते जी.बी.ने २ कोटी वाढवून ३८ कोटी केले. २०१५-२०१६ मध्ये स्थायी समितीने ३ कोटी वाढवले व ५८ कोटी सूचवले. आपल्याकडे ९९९८६ प्रॉपर्टीज आहेत. २००० करदाते वाढले त्यानुसार निघते का चटई क्षेत्र निघते त्याची आर.व्ही.६७ कोटी ५० लाख आहे. त्याला २७% टक्के संकलीत कर ११ कोटी एवढाच आहे. तर ६० कोटी कोठून आला आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील १२७ प्रमाणे नगररचना मध्ये नोंद केलेली प्रॉपर्टीची असेसमेंट लगेच करायचे. मग ११ कोटी सोडून ४२ कोटी व ५८ कोटी आले कोठून. करदाते १ लाख आहेत. मग एवढी रक्कम वाढली कशी. आपल्या कराच्या डिमांडचे ४ झोन चे तक्ते आहेत. ४ झोन डिमांड व वसूल सांगीतले. एकुण वसूल फक्त ८ कोटी झाला संकलीत कर १६ कोटी डिमांड व शास्ती डिमांड ५६ कोटी शास्ती पैकी ५ कोटी ९० लाख कोणत्या आकडयांत ताळमेळ समजायचा. १८ कोटी वर ५६ कोटी शास्ती ही कोणती थकबाकी आहे. आपल्याला १ ते १०% वाढ सुचवता येते ९ कोटी स्थायी समितीने वाढ कशी सूचवली. हे ९ कोटी कोठून येणार. १८ कोटीवर आपली डिमांड नाही. आयुक्तांनी सूचवलेली व प्रस्तावित केलेली. ते सूचवतात ९ कोटी कशाच्या आधारे.

**उपायुक्त श्री.बेहेरे :-** ६० कोटी आयुक्तांनी सूचविली होती. १ लाख करदात्यांची आर.व्ही.आपल्याकडे आहे.

**मा.श्री.दिप चव्हाण :-** आर.व्ही. वर १८ कोटी पुढे जात नाही.

**उपायुक्त श्री.बेहेरे :-** आपण जीआयएस ने करीत आहोत. तसेच भाडे मूल्याचे एवढे अपडेट केले तर ती रक्कम दुपटीपेक्षा पुढे जाते.

**मा.श्री.दिप चव्हाण :-** जी.आय.एस. च्या कंपनीची मुदत संपली आहे. आम्हाला प्रॅक्टीकल बजेट द्या.

**उपायुक्त श्री.बेहेरे :-** जी.आय.एस. मध्ये फक्त घरे नाहीत. त्यात १८ पातळी आहेत. आपण १५ लाख बिल दिले. २.२५ कोटीचे काम आहे.

**मा.श्री.दिप चव्हाण :-** हे बजेट ज्या ज्या विभागातून गेले त्यांचे काय शेरे आहेत ते सांगा.

**उपायुक्त श्री.बेहेरे :-** बजेटची प्रक्रीया सांगीतली.

**मा.श्री.दिप चव्हाण :-** माझा मुद्दा आहे. तुम्ही प्रॅक्टीकल बजेट मांडले नाही. पाणीपट्टी प्रत्यक्ष किती वसूल सांगा ७ कोटी आणि ते २५ कोटी पैकी मी म्हणतो प्रॅक्टीकल बजेट करा. पान नंबर ९० वर भुयारी गटार अमृत योजनेचे पैसे किती धरले, १५० कोटी, त्याला केंद्र किंवा राज्य शासनाचे याला कोणचेही पत्र नाही.

**मुख्यलेखाधिकारी श्री.विसपुते :-** जी.आर वर १५० कोटी आहे.

**मा.श्री.दिप चव्हाण :-** कोठे मंजूरी आहे.

**मेकॅनिकल इंजिनियर श्री.निकम :-** अमृत योजने अंतर्गत भुयारी गटार योजना १५० कोटीची आहे. या योजनेत ५ घटक - बागा, सोळा इत्यादी ५ घटक आहेत. पुढील वर्षी भुयारी गटार करीता आहे. यामध्ये १५० कोटी पुढील वर्षी असल्याने तरतूद ठेवली आहे.

**मा.श्री.दिप चव्हाण :-** शासनाची मंजूरी आली का.

**मेकॅनिकल इंजिनियर श्री.निकम :-** मंजूरी नाही. पण पुढील वर्षी देणार आहेत असे सांगीतले.

**मा.श्री.दिप चव्हाण :-** मागच्या वर्षी भुयारी गटारी करीता १०२ कोटींची तरतुद होती.

**मेकॅनिकल इंजिनियर श्री.निकम :-** मागच्या वर्षीची योजना वेगळी होती आता अमृत योजना सुरु केली आहे.

**मा.श्री.दिप चव्हाण :-** ज्या प्रोव्हीजन आहेत त्याला फक्त टोकन रक्कमेची तरतुद करा. व रक्कम आल्यावर ती रक्कम जमा करा. मोठया रक्कमा दाखवुन आकडे वाढतात. सोलर बाबत पान नंबर ८५ वरील काम आहे.

**मेकॅनिकल इंजिनियर श्री.निकम :-** सोलर अमृत योजने अंतर्गत केली आहे. २८.७५ कोटी मंजूर झाले त्यातील पहिला हप्ता मा.जिल्हाधिकारी साहेब यांचेकडेस आला आहे. २८.७५ पैकी २० कोटी या वर्षी येणार आहेत.

**मा.श्री.दिप चव्हाण :-** पान नंबर ८५ वर २२ व २३ नगरोत्थानला किती कामे झाली व किती रक्कम दाखवली ते पहा.

**इंजिनियर श्री.सोनटक्के :-** ३ कोटी

**मा.श्री.दिप चव्हाण :-** पैसे आले किती.

**इंजिनियर श्री.सोनटक्के :-** १.५ कोटी जिल्हास्तर नगरोत्थान मध्ये ३ कोटी मिळणे अपेक्षित आहे.

**मा.श्री.दिप चव्हाण :-** पान नंबर ८३ वरील फेज-२ मधील कामे वगळुन फेज-३ करीता ५० कोटी कोठून आली. फेज-२ कामे पुर्ण नाही. फेज-३ कोठून आली.

**मेकॅनिकल इंजिनियर श्री.निकम :-** फेज-२ मध्ये जी कामे नव्हती ती फेज-३ मध्ये आहेत.

**मा.श्री.अभय आगरकर :-** आपण बजेट फुगवुन दाखवता ते डिफेक्ट बजेट आहे.

**मेकॅनिकल इंजिनियर श्री.निकम :-** आपण पुर्ण रक्कमेची तरतुद दाखवली नाही तर शासन योजना मंजूर करणार नाही. हे उत्पन्न नाही. या भांडवली जमा आहेत.

**मा.श्री.गणेश भोसले :-** या रक्कमा वाढवुन त्याचा काय फायदा आहे.

**मा.श्री.दिप चव्हाण :-** तेथे ५० कोटी कमी करा. हुडकोचे क्रमांक २१ वर कशासाठी आहे. पान नंबर ९२ वर विद्युत भार विळद येथील तो २५ कोटीचा कसा.

**मेकॅनिकल इंजिनियर श्री.निकम :-** नविन पंपिंग मशिन करीता विद्युत भार वाढविणे करीता २.५ कोटी लागतात.

**मा.श्री.दिप चव्हाण :-** बजेट मध्ये शिक्षण कर व वृक्ष कर मिळुन रक्कम वजा करावी लागते. १ कोटीची कामे वृक्षकर मध्ये काय झाले.

**मा.उपायुक्त श्री बेहेरे :-** आर.व्ही.च्या १/२ टक्के व अपेक्षित उत्पन्न धरले.

**मा.श्री.दिप चव्हाण :-** घनकच-या करीता २ कोटी ५० लाख दोन वेळा सुचविली. तसेच ४ कोटी ५० लाख जिल्हाधिकारी यांचे कामाकरीता सुचविली. ही तरतुद दोन वेळा झाली.

**मा.उपायुक्त श्री.बेहेरे :-** २ वेळा नाही. कारण कामे वेगवेगळी असतात.

**मा.श्री.दिप चव्हाण :-** पान नंबर ४१-४२ कुत्र्यांवरील कर किती.

**मा.उपायुक्त श्री.बेहेरे :-** ५०००/- रुपये

**मा.श्री.दिप चव्हाण :-** दवाखाने बंद करणे संदर्भात आपण सूचविले आहे त्याबाबत सांगा.

**वैद्यकीय आरोग्य अधिकारी श्री.राजुरकर :-** दाणेडबरा व नविपेठ हे दोन्ही महानगरपालिका चालविते. ते दवाखाने अनुदानीत नाहीत. कै.बाळासाहेब देशपांडे दवाखान्याचा औषध खर्च महिला व बालकल्याण व औषधे खरेदी या दोन हेड खाली खरेदी होते.

**मा.श्री.दिप चव्हाण :-** देणे किती आहेत.

**मुख्यलेखाधिकारी श्री.विसपुते :-** २८ कोटी, पुरवठादार २ कोटी.

**मा.श्री.दिप चव्हाण :-** सहावा वेतन फरक ६ कोटी. ठेकेदार २५ कोटी. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण २ कोटी असे ७० कोटी देणे आहे. ग्रॅज्युएटी १४० कोटी देणे बाकी आहे. पेन्शन विक्री १ कोटी. ७५ कोटी कशातुन देणार ते सांगा. ग्रॅज्युएटीला किती तरतूद होती मागच्या वर्षी ---

**मुख्यलेखाधिकारी श्री.विसपुते :-** पान नंबर ५५, २५ कोटी तरतूद होती.

**मा.श्री.दिप चव्हाण :-** तरतूद केली पण दिली का नाही.

**मुख्यलेखाधिकारी श्री.विसपुते :-** वसुली अपेक्षित आहे. त्यातून देण्यात येईल.

**मा.श्री.दिप चव्हाण :-** कर्मचारी पतसंस्थेचे पैसे कापून घेतले कर्मचा-यांचे ते पतसंस्थेकडे का भरले नाही. योजनेचा हिस्सा भरणे तर सोडा पण कर्मचा-यांची रक्कम देणे सुध्दा शक्य झाले नाही.

**मा.महापौर साहेब :-** वसुली चांगल्या प्रकारे करण्याचे आदेश दिले आहेत.

**मा.श्री.दिप चव्हाण :-** कर्मचा-यांचे पैसे कापले ते ११ कोटी, देण्याचे कसे देणार ते सांगा.

**मा.महापौर साहेब :-** काही महिन्यापूर्वी पगार नीट होत नव्हते ते आता नियोजन करुन सुरळीत केले. यामधून अजूनही व्यवस्थापन करता येईल.

**मा.उपायुक्त श्री.चारठाणकर :-** कर्मचा-यांचा नेट पगार काढतो व देतो व वजावट नंतर देण्याचा प्रयत्न केला जातो. ग्रॅज्युईटी बाबत मागच्या काही कर्मचा-यांच्या बाबत हयगय झाली असेल. हे पैसे दिले जावेत या अनुशंगाने १ एप्रिल २०१६ पासून करत आहोत. ते ३ महिन्यात दिले जातील. आजच सोसायटीचे काही पैसे देत आहोत. उरलेले ३-४ दिवसात दिले जातील. पेन्शन विक्री हा प्रशासनाचा तारतम्य अधिकार आहे.

**मा.श्री.दिप चव्हाण :-** एलआयसी चा हप्ता दिला जात नाही. त्याचे काय

**मा.उपायुक्त श्री.चारठाणकर :-** विमा व पोस्ट याचे पैसे नियमीत भरले जातात.

**मा.श्री.दिप चव्हाण :-** बजेट रियल करुन सादर करावे.

**मा.सौ.सुनिता कांबळे :-** फेज-२ पाणी पुरवठयाचा विषय आहे केडगांव येथील फेज-१ चे काम पूर्ण झाले आहे. नळ कनेक्शनचे काम पूर्ण झाले आहे.

**मा.श्री.विजय गव्हाळे :-** भाग्योदय मंगल कार्यालयाकरीता १० लाख इतकी तरतूद करावी. कार्यालय जूने आहे दुरुस्ती आवश्यक आहे.

**मा.श्री.अभय आगरकर :-** सन २०१६-२०१७ चे अंदाजपत्रक मांडले. चर्चा झाली. अंदाजपत्रक मांडतो तेंव्हा शहराला आपण काय देतो. शहरविकासा बाबत काय भुमिका आहे. याचे प्रतिबिंब दिसते. आर्थिकस्थिती दयनीय आहे. पगार , पेन्शन विक्री होत नाही. ७० कोटी रुपये देणे आहे. अशा परिस्थितीतून विकासाचे स्वप्न पहातो. ते किती साध्य करु याबद्दल साशंका आहे. शहर अभियंता ने ग्राउंड लेव्हल वर जाऊन माहिती घेतली पाहीजे. उद्याने ही काळाची गरज आहे. त्या दृष्टीने आर्थिक नियोजन आहे की नाही हे पाहीले पाहिजे. उद्याने ही काळाची गरज आहे. त्यादृष्टीने आर्थिक नियोजन आहे की नाही हे पाहिले पाहिजे. महसुल २८३ कोटी व वसूल १३० कोटी आहे. वेगवेगळया योजना आपण अंमलात आणतो. आपले उत्पन्न खर्च व शिल्लक रहाणारे उत्पन्न याचा विचार केला तर उत्पन्न स्पष्ट होते. काही वेळा टिका झाली पाहिजे. त्यामुळे विरोधकांचा अंकूश असला पाहिजे. मुख्यलेखाधिकारी यांनी सांगावे उत्पन्न किती.

**मुख्यलेखाधिकारी श्री.विसपुते :-** ११५ कोटी, १९२ कोटी अपेक्षीत भांडवली ७८ कोटी प्राप्त.

**मा.श्री.अभय आगरकर :-** खर्च किती.

**मुख्यलेखाधिकारी श्री.विसपुते :-** ८४

**मा.श्री.अभय आगरकर :-** हे सगळे दिशाभुत करणारे बजेट आहे. वास्तव बजेट करायचे असेल तर बदल करा. कुत्रे निर्बिजीकरणाकरीता ५० लाख तरतूद करुन काहीच हाशील झाले नाही. कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना अद्यावत करताना ब्लड बँकेचे अधुनिकीकरण करणे, ब्लड बँकेचा डॉक्टर किती दिवसापासून बसून पगार घेतात. बोरगे दोशी आढळले हा बसून पगार घेतो. त्याला नोटीसही पाठवत नाही व ७५% पगार देतो व त्याची कोणतीही सेवा मिळत नाही. आपण गांभीर्याने पाहिले पाहीजे. कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना बांधल्यावर फक्त डागडुजी करीत आलो. इतर महानगरपालिकेचे अद्यावत हॉस्पीटल आहेत. जे आहे ते आपण चालवू शकत नाही. सह्याद्री हॉस्पीटल बरोबर आपण हायअप केले तर जास्त चांगली सेवा देवू शकतो. निर्बिजीकरणाची तरतूद कमी करावी. जेंव्हा निधी उपलब्ध असतो तेंव्हा तुम्ही तुमच्या वॉर्डात खर्च करतो.

**मा.श्री.गणेश भोसले :-** असे कोठे झाले ते सांगा.

**मा.महापौर साहेब :-** आपण ज्येष्ठ आहात असे सभेत आरोप करु नका.

**मा.श्री.अभय आगरकर :-** मी कोणाच्या मध्ये बोललो नाही. माझ्या मध्ये बोलू नका.

**मा.श्री.गणेश भोसले व मा.श्री.स्वप्नील शिंदे :-** आपल्या आरोपावर आम्ही आक्षेप घेतला.

**मा.महापौर साहेब :-** आपण असे आरोप सभेत करणे योग्य नाही. आपल्या सूचना जरुर करा.

**मा.श्री.अभय आगरकर :-** विकास समतोल करा. जो वॉर्ड मागास असेल तेथे विकास करा. पान नंबर ८५ बघा. आपण एकाच ठिकाणी ५० लाखाच्या तरतुदी केल्या आहेत. पान नं.४० व ४१ नंबरच्या तरतुदी वाचा.

**मा.महापौर साहेब :-** पत्रावर नावे सूचवा. तशी दुरुस्ती करता येईल.

**मा.श्री.अभय आगरकर :-** आपण बोलण्याची संधी समान द्या. आम्ही यापुर्वी सभेत रात्री १२-१ पर्यंत चर्चा केली.

**मा.महापौर साहेब :-** आपण सुरुवातीला बरोबर सूचनांसह बोलत होता. पण विषयांतरामुळे आक्षेप घेतले गेले.

**मा.श्री.गणेश भोसले :-** या २ गार्डनचा विषय मागील ३ बजेट पासून येत आहे.

**मा.श्री.अभय आगरकर :-** हे एकाच ठिकाणी खर्च करण्यापेक्षा ४ ठिकाणी करावा.

**मा.महापौर साहेब :-** प्रत्येक झोन मध्ये करता येईल.

**मा.श्री.अभय आगरकर :-** हे बजेट रिॲलिस्टीक नसेल.

**मा.श्री.संपत बारस्कर :-** स्व.अनिल क्षिरसागर व स्व.अमरापूरकर या अभिनयामुळे प्रसिध्द झालेल्या अभिनेत्यांच्या नावाने पुरस्कार करावा. याबाबत ठराव करावा. मा.आमदार श्री.संग्राम जगताप यांनी तसे पत्र दिले आहे.

**मा.श्री.गणेश भोसले :-** नेहरू मार्केटचा विषय घेतला. परत त्यांची सूचना विचारात घ्यायला हरकत नव्हती. पण तो स्थायी समितीला विचारार्थ आला. तेंव्हा भारतीय जनता पक्ष व शिवसेनेचे सदस्य स्थायी समितीत होते. तेंव्हा हा विचार मांडता आला असता.

**मा.महापौर साहेब :-** कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना बाबत खाजगीकरणातून कार्यवाही करणे झाल्यास नामांकीत सेवाभावी संस्था किंवा सामाजीक बांधीलकीच्या माध्यमातून सदर क्षेत्रात काम करण्यास तयार असणा-या औद्योगीक संस्था यांच्या माध्यमातून सेवा सक्षमी करण करता येईल.

**मा.श्री.अनिल शिंदे :-** सर्व नगरसेवकांच्या वतीने विनंती करतो ५ लाख नगरसेवक निधी ऐवजी ७.२५ व २.५ दुसरी अशी एकुण १० लाख तरतुद करावी. या निधीत स्थायी समितीच्या सभापतींनी सांगीतले तशी दर हप्त्याने पैसे टाकणार ते प्राधान्याने नगरसेवकांना द्यावा. ६८ वॉर्डात कामे होती ते बील येतील त्या बिलांना प्राधान्य द्या. त्यामुळे तुमच्यावर आरोप होणार नाहीत.

**मा.महापौर साहेब :-** नोंद घेण्यात यावी व सदरची मागणी कॅफो यांनी तपासून घ्यावी.

**मा.श्री.अभय आगरकर :-** माझ्याकडे मा.आयुक्तांचे पत्र आहे. तुम्हाला नगरसेवक निधीमध्ये वाढ करता येत नाही. तर सर्वच निधी घ्या.

**मा.महापौर साहेब :-** फैय्याजभाई बोला .

**शेख फैय्याज -** आपत्कालीन मध्ये जास्तीत जास्त तरतूद करा.

**मा.श्री.दिप चव्हाण :-** शिक्षण मंडळा संदर्भात काय सुचवले ते गोषवा-यात आले नाही ते कोठे आहे.

**मा.महापौर साहेब :-** सर्वांनी आपले म्हणणे मांडले आहे. चर्चा पुरेशी आहे. मी माझे मनोगत वाचतो.

**मा.महापौर साहेब यांचे मनोगत**

**।। नमस्कार ।।**

अहमदनगर शहराचे ग्राम दैवत श्री. विशाल गणपती व राष्ट्रसंत श्री आनंदऋषीजी महाराज साहेब यांच्या आर्शिवादाने, फुले,शाहु,आंबेडकर विचारधारेने समाजातील प्रत्येक घटकापर्यत महानगरपालिकेच्या माध्यमातुन कार्य करण्यासाठी आदरणीय मा.श्री. शरदचंद्रजी पवार साहेब, राज्याचे मुख्यमंत्री मा. ना.श्री.देवेंद्रजी फडणवीस साहेब, माजी उपमुख्यमंत्री मा.श्री.अजितदादा पवार साहेब, अहमदनगर जिल्हापालकमंत्री मा.ना.श्री.रामजी शिंदे, माजी मंत्री मा.श्री मधुकररावजी पिचड, मा.आ.श्री. बाळासाहेब थोरात , विरोधी पक्ष नेते मा.ना.श्री.राधाकृष्ण विखे पा.,

राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष मा.श्री.दादाभाउ्र कळमकर , राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष मा.श्री चंद्रशेखर घुले, मा.आ.श्री. अरूणकाका जगताप, माजी नगराध्यक्ष मा.श्री.शंकरराव घुले, मा.आ.श्री.संग्रामभैय्या जगताप यांच्या बहुमोल मार्गदर्शनाखाली त्याच प्रमाणे सहकारी नगरसेवक, नगरसेविका आपणा सर्वाचे मार्गदर्शन व सहकार्य तसेच अधिकारी व कर्मचारी वर्गाचे सर्वतोपरी सहकार्य मला कामकाज करतांना मिळत आहे, याचा मनस्वी आनंद होत असुन मी अहमदनगर महानगरपालिकेचे सन २०१६- २०१७ या आर्थिक वर्षाचे अंदाज पत्रक घेउन आपणा समोर येत आहे.

या आर्थिक वर्षामध्ये नागरी सुविधेच्या दृष्टीने शहर व उपनगराच्या विकासाच्या दृष्टीने व आपणा सर्वांच्या कल्पकतेतून महानगराचा विकास करण्यासाठी जास्तीत जास्त कामे पुर्ण करण्याचा मानस असून मनपाचे उत्पन्नाचे स्त्रोत व नागरी सुविधेबाबतची मागणी विचारात घेवून त्यातून मार्गक्रमण करण्याचा प्रयत्न करतांना मनपाचा आस्थापना खर्च तसेच इतर खर्च कमी होण्याच्या दृष्टीने मनपाच्या काही सेवा व प्रकल्प खाजगीकरणाच्या माध्यमातून विकसीत करून शहर वासियांना नागरी सुविधा देण्याबाबतचा उपक्रम हाती घेण्याचा मानस आहे.

- **सावेडी परिसरातील गंगाउद्यान प्रकल्पामागील जागेत नियोजित ॲम्युझमेंट पार्क-** शहरात येणारे लहान मुले व शहरातील लहान मुलांना मनोरंजनाचे उत्तम स्थळ बनेल. तसेच शहरातील नागरीकांना यापार्कच्या माध्यमातून उत्तम सुविधा उपलब्ध करून देण्याचा मानस असून याबाबत मनपाची आर्थिक स्थिती विचारात घेता खाजगी करणाच्या माध्यमातून सदरचा प्रकल्प विकसीत करण्यात येणार आहे.
- **ऐतिहासिक व धार्मिक महत्व पाहता यातून पर्यटन विकासासाठी प्रयत्न -** नगर शहर व परिसरातील राष्ट्रसंत आनंदऋषीजी महाराज साहेब यांचे समाधीस्थळ , विशाल गणपती मंदिर , अवतार मेहरबाबा, केडगांव येथील रेणुका देवी, भिंगार येथील रोकडेश्वर मंदिर तसेच फ-याबाग, भिस्तबाग महाल, अहमद शहा बादशहा यांचे समाधीस्थळ परिसर बागरोजा, भुईकोट किल्ला अशा परिसरातील ऐतिहासिक व धार्मिक महत्वाच्या दृष्टिने या परिसराचा विकास होण्याकरिता पर्यटनाच्या माध्यमातून विकास योजना राबविल्याने निश्चितच इतिहासप्रेमी व भाविक परदेशातून, भारतातून तसेच राज्यामधून या परिसरास भेटी देतील. या मधून विविध व्यवसायांना चालना मिळून रोजगार निर्मिती होण्यास मदत होणार आहे. याकरिता मा.शासनाच्या संबंधीत विभागाशी संवाद साधनेचे दृष्टीने याबाबत प्रकल्प अहवाल तयार करण्यात येणार आहे.
- **मा.शासनाच्या अमृत योजने अंतर्गत पिण्याच्या पाण्याच्या योजनेची कामे,सौर उर्जा प्रकल्प राबविणे,उदयान प्रकल्प व भुयारी गटर योजना -** मा.शासनाने मनपाकरीता पिण्याच्या पाण्याच्या योजने वरील कामे करण्यासाठी १४९ कोटी रक्कमेचा निधी मंजूर केला असून याबाबत केलेल्या पाठपुराव्यातून ८ कोटी रक्कमेचा निधी उपलब्ध झाला आहे.याबाबत प्रकल्पास गती मिळण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचे मार्फत १४९ कोटी रक्कमेचे एस्टीमेट तयार करण्याचे काम सुरू आहे.तसेच मनपास प्रती वर्षी शहरासाठी होणारा पाणी उपसा करण्यासाठी असलेल्या यंत्रणेस विदयुत पुरवठयाचे बील सुमारे १७ कोटी पर्यत रक्कम अदायगी करावी लागते.या यंत्रणेकरीता सौर उर्जेच्या माध्यमातून विज पुरवठा झाल्यास हा मोठया प्रमाणावरील खर्च कमी होणार आहे.उदयान प्रकल्प राबविण्याच्या दृष्टीने देखील या योजनेत तरतूद असून शहर व उपनगरामध्ये उदयान प्रकल्प राबविण्याच्या दृष्टीने प्राथमिक कार्यवाही सुरू करण्यात आली आहे.
- भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा ज्योतिबा फुले यांचा पूर्णाकृती पुतळा उभारणे चा मानस असून त्या दृष्टिने येत्या आर्थिक वर्षात कार्यवाही हाती घेण्यात येणार आहे. तसेच छत्रपती संभाजी महाराज यांचा पुर्णाकृती पुतळा उभारणे कार्यवाही प्रलंबित असून त्यातून मार्गक्रमण करून सदर पुतळा बसविण्यात येणार आहे. तसेच पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे स्मारक उभारण्याच्या दृष्टिने देखील ठराव पारित झालेला असून त्याची ही कार्यवाही हाती घेण्याचा मानस आहे.

- **राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान-** या अभियाना अंतर्गत नविन आरोग्य केंद्राचे बांधकाम करणे व आरोग्य विषयक सेवा पुरविणे. या दृष्टिने मनपाने मा.महासभेच्या मंजूरीने प्रस्ताव मा.शासनाकडे सादर केला होता. त्यास अनुमती मिळाली असून निधीस मंजूरी प्राप्त झाली आहे. या योजनेमध्ये नागापूर-बोल्हेगांव , केडगांव, मुकुंदनगर या परिसरासाठी आरोग्य केंद्राचे बांधकाम करून इमारत उभारण्यात येणार असून याबाबत निविदा मागविण्यात आलेले असून लवकरच मंजूर निविदाकार यांना कार्यारंभ आदेश देण्यात येणार आहे.त्यामुळे लवकरच या प्रकल्पाचे बांधकाम सुरू होईल.
- **अनुकंपा,सफाई कामगार व इतर नियुक्त्या करतांना कामगारांना प्रोबेशन कालावधी मध्ये नियमाप्रमाणे मंजूर वेतन श्रेणीचे वेतन देण्याचा ऐतिहासिक निर्णय -** सफाई व मेहतर कामगारांना नियुक्ती देताना एकत्रित वेतना ऐवजी नियमित वेतन श्रेणीनुसार वेतन देण्याबाबत नुकतीच मान्यता देण्यात आलेली असून या कर्मचा-यांप्रमाणे आस्थापना सुचीवरील इतर पदांवर नियुक्ती देताना सर्व कर्मचा-यांना मंजूर वेतनश्रेणी लागू करावी. असा निर्णय घेण्यात आला.
- **घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पातील महत्वपूर्ण निर्णय -** मा.राष्ट्रीय हरित लवाद यांच्या मार्गदर्शक सुचनानुसार सावेडी येथील १०० मेट्रीक टन खत प्रकल्पाचे काम दोन महिन्याचे आत पूर्ण करण्याबाबत आदेश देण्यात आलेले असून या प्रकल्पाबाबत महत्वपूर्ण निर्णय घेण्यात आलेले असून शहरामधील आरोग्य विषय प्रश्नांची सोडवणुक होण्यासाठी मनपा हद्दीत १०० कंटेनर , दोन कॉम्पॅकटर तसेच सायकल रिक्षा , ढकलगाडी ,फायबर कुंडया आदी उपलब्ध करण्याबाबत कार्यवाहीचा निर्णय घेण्यात आला आहे. तसेच कचरा संकलन व वाहतुक बाबतच्या महत्वपूर्ण उपक्रम लवकरात लवकर कार्यान्वीत होण्याच्या दृष्टिने प्रशासनाकडून निविदा प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.
- **विकास आराखडयातील रस्ते प्रकल्प -** मा.केंद्रशासन, मा.राज्य शासन विविध योजनेच्या माध्यमातून नागरी सुविधेचे दूरगामी प्रकल्प राबविणेसाठी अर्थ सहाय्य उपलबध करून देते. याकरीता गेल्या आर्थिक वर्षामध्ये रस्ते प्रकल्प राबविणेच्या दृष्टीने मा.महासभेचा सविस्तर ठराव पारीत करण्यात आलेला आहे.व त्यादृष्टीने प्रशासनाकडून कार्यवाही सुरू असून १०० रस्त्यांचा प्रकल्प यामध्ये अंतर्भूत असून मा.शासनाकडून विशेष निधी प्राप्त झाल्यास अशा प्रस्तावांचा अंतर्भाव करून त्वरेने योजना हाती घेता येतील. शहर व उपनगर व वाढीव हद्दीतील रस्ते बांधणी प्रकल्पाचे नियोजन असून जशा निधी उपलब्ध होईल तशी कारवाई सुरू होईल. यामुळे शहरातील नागरी सुविधेचा रस्त्याबाबतचा मोठा प्रश्न सुटण्यास मदत होणार आहे.
- **मनपा हददीतील स्ट्रीट लाईटची देखभाल व दुरूस्ती खाजगीकरणाच्या माध्यमातून करणे -** मनपा हददीतील स्ट्रीट लाईटची देखभाल व दुरूस्ती खाजगीकरणा कडे दिल्यास सदर साहीत्य खरेदी व त्याची देखभाल व दुरूस्ती या खर्चामध्ये नियंत्रण आणणे सुलभ होणार आहे.तसेच आस्थापना सुचिवरील नियुक्त वायरमन मनपा पाणी योजना व प्रॉपर्टी याचे देखभालीसाठी उपयोगात आणता येतील व कॉन्ट्रॅक्ट बेसीस वर वायरमन करीता होणार खर्च बंद होइल तथापी निविदाकार यांना देखभाल दुरूस्तीसह वीज बील नियंत्रणात आणणेची जबाबदारी दिल्यास खाजगीकरणाच्या माध्यमातून होणारा खर्च मनपा खर्चाच्या तुलनेत कमी होण्यास मदत होईल.या दृष्टीने कार्यवाही करण्याचा मानस आहे.
- **सावेडी उपनगरामध्ये नाटयगृह-** या प्रकल्पाचे काम सुरू होण्याच्या दृष्टीने महापौर पदाची सुत्रे हाती घेतल्यानंतर प्रथम काम सुरू करून घेण्यात आले असून याबाबतचे प्राथमिक काम सुरू असून आधुनिक व अद्यावत पध्दतीचे नाटयगृह बांधण्याचा महानगरपालिकेचा मानस आहे. त्यादृष्टिने कार्यवाही सुरू आहे.या संदर्भामध्ये शहरातील नाटय प्रेमी यांच्या भावना लक्षात घेउन १००० आसन क्षमतेचं नाटय गृह उभारणेत येणार आहे.

- **खाजगी करणाच्या माध्यमातून चौक सुशोभिकरण -** खाजगीकरणाच्या माध्यमातून चौक सुशोभिकरण करण्याचा ठराव यापूर्वी मंजूर केलेला आहे. त्यादृष्टिने मी स्वत: काही उदयोजक व व्यवसाय संस्था यांचेशी चर्चा केलेली असून त्यांनी शहरातील चौक सुशोभिकरणाबाबत तयारी दर्शविलेली आहे.याबाबत
एल ॲन्ड टी कंपनी,सन फर्मा कंपनी,तसेच भारतीय जीवन बिमा निगम,पूणे,फिरोदिया ग्रुप या व्यवसाय संस्थेशी संपर्क साधण्यात आला असून लवकरच याबाबत कार्यवाही सुरू होईल.
- **महापौर चषक स्पर्धा** - या अंतर्गत महिला कुस्ती स्पर्धा,शरीर सौष्ठव स्पर्धा ,राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धा, क्रिकेट स्पर्धा ,कबड्डी स्पर्धा मॅरेथॉन स्पर्धा, राज्यस्तरीय नाटय स्पर्धा, अशा विविध स्पर्धा चे आयोजन करण्याचा मानस आहे. यातून शहरातील विविध खेळाडू तसेच नाटयप्रेमी यांना प्रोत्साहन मिळावे तसेच शहरातील नागरिकांना सदर स्पर्धा पाहण्यासाठी उपलब्ध होतील.
- **महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान योजने अंतर्गत** केडगाव देवी रस्त्यावरील तांत्रिक अडचणी तसेच याकामात येणारे अडथळे दूर करून सदरचे काम अंतिम टप्प्यात आणले आहे.तसेच बालिकाश्रम रस्ता येथील रस्त्याचे काम पूर्ण करून घेण्यात आले असून दिवा बत्तीची सोय करणेचे काम अंतिम टप्प्यात आहे.शहाशरीफ दर्गा ते वन विभाग कार्यालयापर्यतचा रस्त्याचे काम अंतिम टप्प्यात आहे.सदरचे काम लवकरात लवकर पूर्ण होणार आहे.
- **आयएचएसडीपी फेज-२ घरकुल योजना-** घरकुल योजने अंतर्गत काटवन खंडोबा मंदिरा मागे ३७२ सदनिका बांधणे प्रकल्पाचा लोकार्पण सोहळा साजरा केला असून याबाबतच्या उर्वरीत तांत्रिक बाबी पूर्ण करून लवकरात लवकर लाभार्थीना प्रत्यक्ष सदनिकेचा ताबा देण्यात येणार आहे.
- **सावेडी परिसरासाठी स्मशानभूमी उभारणे-** ही गेल्या अनेक वर्षापासून नागरिकांची मागणी असून याभागातील लोकांना शहरातील अमरधाम दूर पडते. त्यादृष्टिने स्मशानभूमी उभारणे बाबत कार्यवाही करण्याच्या दृष्टिने यापूर्वी निर्णय झालेला असून सदरच्या आरक्षणाबाबत टीडीआर अथवा भूसंपादनाच्या माध्यमातील कार्यवाही प्रशासनाने तात्काळ सुरू करावी.
- **मनपा छाननी समितीमध्ये विकास कामाची प्रक्रीया सुलभ करणार -** मनपास विकास कामासाठी मा.शासनाकडून विविध योजने अंतर्गत निधी उपलब्ध होतो.सदर कामांच्या प्रशासकीय मान्यता घेवून निविदा प्रक्रिया झाल्यानंतर पुन्हा छाननी समितीमध्ये तपासले जाते.छाननी समिती शक्यतो आठवडयातून एक दिवस मंगळवारचा निश्चित केलेला आहे. या कामांस बराच विलंब लागत असल्यामुळे छाननी समितीच्या कामात सुधारणा करण्याच्या दृष्टीने इतर महानगरपालिकेमध्ये असलेल्या कार्यपध्दती बाबत माहीती घेण्यात येवून विकास कामाकरिता कार्यालयीन कामकाजात वेळ वाचवता येण्याचे दृष्टीने असलेली कार्यपध्दती तपासून ती सुरू करण्याबाबत लक्ष घालणेत येणार आहे.यामुळे कमीत कमी कालावधीत कामे मार्गी लावण्याच्या दृष्टीने निश्चीतच मदत होणार आहे.
- **दृष्टीक्षेपात.....**
- **मनपा आकृतीबंधाच्या माध्यमातून प्रशासकीय कामकाजाची गती वाढविणार-** मा.शासनाकडे आकृतीबंधचा प्रस्ताव मंजूरीसाठी पाठविण्यांत आला होता. मा.शासनाने महानगरपालिकेच्या कर्मचारी आकृतीबंधास मान्यता दिली असून या बाबतची पुढील कार्यवाही सुरू असून लवकरच तांत्रिक तसेच अधिकारी,कर्मचारी यांची पदे भरण्यांत येतील. त्यामुळे महानगरपालिकेच्या कामकाजामध्ये सुधारणा होवून कामातील गतिमानता वाढण्यास मदत होणार आहे.

- **महालक्ष्मी उदयान, सिध्दीबाग खाजगी करणाच्या माध्यमातून विकसीत करणार** -महानगरपालिकेच्या बागा आकर्षक शहर सौदर्यामध्ये भर टाकणा-या आणि शहरवासियांना मनास प्रसन्न व अल्हाददायक वातावरण असणा-या असाव्यात यादृष्टिने नविन तंत्र व माहितगार काम करणारी संस्था यांचे मार्फत खाजगी करणातून सार्वजनिक बागांचा विकास करण्याचा मानस आहे.
- **स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र** - स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राचे नियोजित इमारतीचे काम लवकरात लवकर पूर्ण करण्याच्या दृष्टीने लक्ष केंद्रीत करण्यात आले असून या इमारती मधील ऑडीटरीयम हॉल विदयार्थाना सुसज्ज यंत्रेणेसह उपलब्ध करून देण्याचा मानस असून इमारतीचा लोकार्पण सोहळा लवकरच करण्यात येणार आहे. २५ एप्रिल २००७ ते सप्टेंबर २०१५ पर्यत अ वर्ग २०, ब वर्ग ८० विद्यार्थ्यांनी स्पर्धा परिक्षा केंद्र माध्यमातून विक्रीकर निरिक्षक, विक्रीकर आयुक्त, पीएसआय, तहसिलदार या सारख्या मा.शासनाच्या महत्वाच्या पदावर परिक्षा देवून नियुक्ती मिळवलेली आहे.
- **महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान योजने अंतर्गत** -टॉप अप पेट्रोल पंप समोरील रस्ता ते दर्गा दायरापर्यतचा रस्त्याच्या कामाच्या निविदा प्राप्त झाल्यानुसार प्रशासनाने कार्यारंभ आदेश देखील दिलेले आहे.या रस्त्याच्या बाबत असलेले अडथळे दूर करण्याच्या दृष्टीने प्रशासनाकडून कार्यावाही करून घेतली जाणार आहे.
- **महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे १२५ व्या जयंती वर्ष निमित्ताने विविध कार्यक्रमाचे आयोजन -** भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे जयंती वर्षाचे औचित्य साधून चर्चासत्र,परीसंवाद,निबंध स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, रांगोळी स्पर्धा आदिंचे आयोजन करण्यात येणार आहे.
- **मा.शासनाच्या आय एच एस डी पी फेज-१ योजने अंतर्गत-** झोपडपट्टी विकास कार्यक्रम अंतर्गत नालेगांव सर्व्हे नं. २२०/२२१ व मोरचूद नगर सर्व्हे नं. ५ येथील २५२ सदनिका व डॉ बाबासाहेब आंबेडकर श्रमसाफल्य योजना या अंतर्गत ११३ सदनिका या उभारलेलया प्रकल्पाचे काम अंतिम टप्प्यात असून या प्रकल्पाचा लोकार्पण सोहळा लवकरच करण्याचा मानस आहे.
- **मा.शासनाच्या नगरोत्थान योजना** (जिल्हास्तर),दलित वस्ती सुधार योजना,मागास क्षेत्र अनुदान योजना,अल्प संख्यांक बहुल क्षेत्र विकास योजना तसेच नाविन्य पूर्ण प्रस्तावातून जिल्हा नियोजन समिती कडून मान्यता दिल्यानुसार करावयाची कामे अशा विविध मा.शासनाच्या अर्थ सहाय्य असलेल्या योजना निविदा तसेच इतर कार्यालयीन सोपास्कार कालबध्द मुदतीमध्ये पूर्ण करण्याच्या दृष्टीने प्रशासनाच्या जबाबदारीतून लवकरात लवकर मार्गी लावण्याचा मानस आहे.कारण मनपाची आर्थिक परिस्थिती विचारत घेता या योजना कामास अनन्य साधारण महत्व आहे.
- **अहमदनगर शहर पाणी पुरवठा योजना फेज**-२ - या योजनेच्या अंतर्गत पूर्ण करावयाच्या पाईप लाईन कामास वेग येण्याच्या दृष्टीने संबंधीत व्यवसाय संस्थेस कामात सुधारणा करणे व कामामध्ये वेग वाढविणे याबाबत लेखी आदेश देण्यात आलेले आहेत. मुळाधरण येथून शहरासाठी पुरेशा प्रमाणात पाणी उपसा होवून शहरवासीयांना पुरेश दाबाने पाणी पुरवठा व्हावा याकरीता पहिल्या टप्प्यातील इलेक्ट्रीक मोटार्स बसविणेचे काम प्रगती पथावर असून सदर योजनेच्या माध्यमातून शहरास येत्या १५ दिवसामधे सुधारीत पाणी पुरवठा करण्याच्या दृष्टीने यंत्रणा सज्ज करावी अशा सुचना केलेल्या आहेत.
- सन २०१६-२०१७ चे अंदाजपत्रक प्रशासनाने तयार करून मा.महासभेपुढे सादर केले आहे. महानगरपालिका उत्पन्नाचे स्त्रोत व नागरी सुविधेचे प्रकल्प पूर्ण करण्याच्या दृष्टिने तोंड मिळवणी करत व शहराचा विकास साधण्याचा निश्चित कार्यक्रम असून यातील योजना शहरवासियांसाठी राबविण्यात येणार आहेत. यामाध्यमातून शहरातील नागरिकांना सुविधा मिळण्यास यातून मदत होणार आहे.

या सर्वाचा विचार करून या शहराचे नागरिक निश्चितपणे मनपास सहकार्य करतील अशी अपेक्षा आहे. तसेच आपल्या सर्वांचे मार्गदर्शन व सहकार्य याची अपेक्षा करित असून ते आपणा सर्वांनकडून निश्चित मिळेल या अपेक्षेसह उपस्थित पदाधिकारी, नगरसेवक, नगरसेविका, अधिकारी व पत्रकार मित्र व इलेक्ट्रॉनिक मिडीया यांचे प्रतिनिधी यांनी माझे मनोगत शांतपणे ऐकून घेतले याबद्दल आभार.

जय हिंद ! जय महाराष्ट्र !

---*---

**ठराव :-**

सन २०१५-२०१६ चे सुधारीत व सन २०१६-२०१७ चे अंदाजपत्रकाबाबत मा.महासभेमध्ये मा.सदस्यांनी केलेल्या सूचना, सभागृहात मा.सदस्यांची प्राप्त झालेली विविध पत्रे तसेच दुरुस्त्या व फेरफार यासह अंदाजपत्रकास ही सभा मान्यता देत आहे. तसेच मा.महासभेमध्ये प्रामुख्याने झालेल्या चर्चेनुसार पुढील प्रमाणे मुद्यांबाबत कार्यवाही करण्यास ही सभा मान्यता देत आहे.

**१)** नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या पाणी पुरवठा योजना स्वयंपुर्ण होण्याच्या दृष्टीने पाणी पट्टीचे दरात वाढ करणे बाबत प्रशासनाने सादर केलेल्या प्रस्तावापैकी घरगुती वापर पाणीपट्टी मध्ये वाढ करण्यांत येवू नये. तसेच व्यवसायिक वापर व औद्योगिक वापर च्या पाणीपट्टी मध्ये प्रशासनाने सादर केलेल्या प्रस्तावानुसार वाढ करण्यांत यावी.

**२)** मा.स्थायी समितीची शिफारशी नुसार प्रस्तावित केलेला अग्निशमन कर लागु करण्यांत येवू नये.

**३)** मा.स्थायी समितीच्या शिफारशी नुसार फिरता दवाखान्या मार्फत पुरविण्यांत येणा-या आरोग्य सुविधा निशुल्क करण्यात यावी.

**४)** आरोग्य विभाग - मनपा सर्व दवाखाने याबाबत सादर केलेल्या प्रस्तावानुसार पुर्वीचे दवाखाने रुग्ण नागरीकांचा प्रतीसाद विचार घेता बंद करणे तसेच उपनगरामध्ये नागरीकांच्या सोईसाठी नविन दवाखाने सुरू करणे या बाबत मा.आयुक्त यांनी प्रस्तावातील कारणमीमांसा तपासुन तसेच आवश्यकता पाहून योग्य ती पुढील कार्यवाही करणेस ही सभा मान्यता देत आहे. प्रस्तावातील दवाखाने बंद करण्यात बाबत निश्चित केल्या नंतर सदर वास्तु खाजगी करणाच्या माध्यमातुन परंतु महानगरपालिकेस तोशिस न लागता मानवतेच्या दृष्टिकोनातून शहरातील नागरिकांसाठी सदरची आरोग्य सुविधा सुरु रहाणेच्या दृष्टीने तसेच या माध्यमातून दुर्धर रोग तपासणी आदी सुविधा उपलब्ध करून देण्याच्या वैद्यकीय सेवाभावी संस्था, विविध कंपन्या, क्लब, स्वयंसेवी संस्था, यांच्या माध्यमातुन सुरु करण्याच्या दृष्टीने याबाबतचा व्यापक प्रस्ताव तयार करुन मा.महासभेपुढे सादर करावा. आणि त्या अनुषंगाने जागा मनपा स्वमालकीची किंवा भाडेतत्वावर उपलब्ध करणे, कर्मचारी व त्या अनुषंगाने इतर आवश्यक बाबीं बाबत योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

तसेच इतर दवाखाने यामधील महीला व बालके उपचार घेतात.अशा बाबींवर होणारा खर्च महीला व बालकल्याण लेखाशिषाच्या तरतुदी मधून करण्यात यावा. तसेच मनपा दवाखान्या मध्ये येणा-या (नागरी आरोग्य केंद्रे) पुरूष रुग्णांच्या सेवा सुविधेचा खर्च नागरी आरोग्य केंद्र असे लेखाशिर्ष निर्माण करून त्यामधून करण्यात यावा. अथवा योग्य त्या लेखाशिर्षा मधून सदरच्या सुविधेची तरतूद करावी.

**५)** मा.स्थायी समितीची शिफारस व सभागृहातील चर्चा यानुसार अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील कुष्ठपिढीत, कुष्ठ पिढीत अपंग रुग्ण या प्रतिरुग्णास प्रतिमहिना रक्कम रुपये १,०००/- अर्थसहाय्य देणे बाबत कार्यवाही करण्यांत यावी. त्या करीता रक्कम रु.७ लाख तरतुद करण्यांत यावी.

**६)** मा.सौ.सुवर्णा संदीप कोतकर, उपमहापौर यांचे पत्रानुसार व सभागृहातील चर्चेनुसार केडगांव परिसरातील कोणताही नागरीक वंचित रहाणार नाही या दृष्टीने UIDSSMT केडगांव पाणीपुरवठा योजनेच्या शिल्लक राहिलेल्या रक्कमेमधुन उर्वरीत भागाचा तातडीने सर्व्हे करुन जलवाहिन्या टाकण्याचे दृष्टीने UIDSSMT केडगांव पाणीपुरवठा योजना या लेखाशिर्षामध्ये रक्कम रु. १ कोटीची तरतुद करण्यात यावी. उर्वरीत भागातील वितरण नलीका तातडीने टाकण्याबाबत योग्य ती कार्यवाही करावी.

**७)** मा.सौ.सुवर्णा संदीप कोतकर, उपमहापौर यांचे पत्रानुसार व सभागृहातील चर्चेनुसार केडगांव भागातील इंदिरानगर, ताराबाग कॉलनी, श्रीराम कॉलनी अंतर्गत पाईपलाईन टाकणे या लेखाशिर्षावर रक्कम रु.१कोटी८५ लक्ष ची तरतुद करण्यांत यावी. तसेच केडगांव पाणीपुरवठा योजनेतुन स्थलांतरीत नळजोडणी पासुन उत्पन्न या लेखाशिर्षा मध्ये रक्कम रु.१ कोटी २५ लक्षची तरतुद करण्यांत यावी. केडगांव पाणीपुरवठा योजनेतुन नळजोडणी स्थलांतरीत करणे या लेखाशिर्षामध्ये रक्कम रु.१ कोटी २५ लक्षची तरतुद दर्शविण्यांत यावी.

**८)** मा.श्री.विपुल शेटीया, नगरसेवक यांनी दिलेल्या पत्रानुसार अहमदनगर शहर पाणी पुरवठा योजना फेज-२ अंतर्गत त्यांचे प्रभागातील नागरिकांचे नळ कनेक्शन नविन लाईनवर स्थलांतरीत करणे तसेच त्या संबंधी इतर कार्यवाही पार पाडणे या कामी प्राथमिक तरतुद रक्कम रु.१० लक्ष करण्यात यावी. तसेच सदरचा खर्च संबंधित प्रभागातील नागरिकांच्या नळजोडणी स्थलांतर उत्पन्नामधुन भागविण्यांत यावा. याकामी रक्कम रुपये १० लक्षची तरतुद करण्यांत यावी.

**९)** मा.श्री.विजय गव्हाळे, मा.श्री.विपुल शेटीया व मा.श्री.आरीफ शेख, नगरसेवक यांचे पत्र तसेच मा.स्थायी समितीची शिफारस व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे शतकोत्तर रौप्य महोत्सव जयंती निमित्ताने महानगरपालिके मार्फत विविध कार्यक्रमाचे आयोजन करणेकामी लेखाशिर्षामध्ये एकुण रक्कम रु.१० लक्षची तरतुद करण्यांत यावी. तसेच डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे मार्केट यार्ड समोरील पुतळा परिसर सुशोभीत करणे साठी रक्कम रू.५ लक्ष चा खर्च महापौर शहर विकास निधीतून भागविण्यात यावा. तरतूद करण्यात यावी. तसेच मंगलगेट येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर समाजमंदीर दुरुस्ती/नुतनीकरण करणेकामी रक्कम रुपये ५ लक्षचा खर्च महापौर शहर विकास निधीतून भागविण्यात यावा.

**१०)** मा.ॲड.श्री.अभय आगरकर, नगरसेवक व मा.श्री.विजय नाना गव्हाळे, नगरसेवक यांनी दिलेल्या पत्रानुसार दिनांक ११ एप्रिल २०१६ रोजी महात्मा फुले जयंती निमित्ताने महानगरपालिका शालेय विद्यार्थ्यांना महात्मा ज्योतीबा फुले, माता सावित्रीबाई फुले यांचे जीवनावरील पुस्तके मोफत वितरीत करण्यात यावीत. या कामी मनपा शिक्षणमंडळ शिष्यवृत्ती योजना / पुस्तके खरेदी या लेखाशिर्षामधुन रक्कम रु. ५० हजाराने वाढ दर्शविण्यात यावी. महानगरपालिका शाळेमधील ई-लर्निंग सुविधा या लेखाशिर्षावरील तरतुद रक्कम रुपये ५० हजाराने कमी करण्यांत यावी.

**११)** मा.सौ.सविता अशोक कराळे, नगरसेविका यांचे पत्रानुसार भाग्योदय मंगल कार्यालय नुतनीकरण या लेखाशिर्षामध्ये रक्कम रु.१० लक्षची तरतुद करण्यांत यावी.

**१२)** मा.सौ.नंदा प्रकाश कुलकर्णी, नगरसेविका यांचे पत्र तसेच याबाबत मा.सदस्य यांनी प्रशासनाकडे वेळोवेळी केलेला पत्र व्यवहार विचारात घेता औरंगाबाद व पुणे येथील महानगरपालिकांनी नागरिकांसाठी घरातील कचरा गोळा करुन कचरा कुंडीत टाकण्याचे दृष्टीने महानगरपालिके मार्फत डस्टबीन उपलब्ध करुन दिलेले आहेत. याबाबत विविध माननीय सदस्यांनी प्रशासनाकडे दिलेल्या मागणीचा विचार करता मा.नगरसेवक यांचे पत्रानुसार व त्यांचे सदस्य निधीमधुन नागरिकांसाठी डस्टबीन तसेच पिशव्या आदी खरेदी करणेबाबत योग्य ती पुढील कार्यवाही घनकचरा व्यवस्थापन विभागाने पार पाडावी.

**१३)** मा.सभागृह नेता श्री.कुमार वाकळे व मा.श्री.संपत बारस्कर नगरसेवक यांनी सभागृहात केलेल्या चर्चेनुसार व दिलेल्या पत्रानुसार लेखाशिर्षाच्या तरतुदी मध्ये वाढ दर्शविण्यात यावी. प्राथमिक सोयी सुविधा रक्कम रु.१ कोटी ३७ लक्ष, BRGF रक्कम रु.४ कोटी, नगरशहर पर्यटन विकास निधी रक्कम रु.२८ लक्ष, महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान योजना रक्कम रुपये ७० कोटी, महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान योजना महानगरपालिका हिस्सा रक्कम रु.३० कोटी, बालविकास प्रकल्प अंतर्गत अंगणवाडी बांधणे लेखाशिर्षामध्ये रक्कम रु.७८ लक्षची तरतुद करण्यांत यावी. मा.स्थायी समितीची शिफारस व महापौर शहर विकास निधी सन २०१६-२०१७ मधील तरतुद विचारात घेता सन २०१५-२०१६ या आर्थिक वर्षात सदर लेखाशिर्षामधील विकास कामांच्या निविदे नंतरची कार्यवाही करणे, कार्यारंभ आदेश देणे, आदी कार्यवाही पुर्ण न होवू शकल्याने रक्कम रु.७ कोटी ५० लक्ष रक्कमेची कामाची स्थिती स्पील वर्क स्तराची आहे. संबंधित कामांचा खर्च रस्ता खोदाई या उत्पन्न बाबीमधुन भागविण्यांत यावा. तसेच उर्वरीत रक्कम २ कोटी ५० लक्ष चा खर्च सर्वसाधारण कराच्या उत्पन्न बाबीतुन करण्यांत यावा. लेखाशिर्षाच्या अदायगी करीता सदरचा निधी उपयोगात आणावा. तसेच भविष्यामध्ये या निधीमधुन प्रस्तावित केल्या जाणा-या कामाचा विचार करता महापौर शहर विकास निधीची एकूण तरतूद १० कोटी रकमेची करण्यात यावी.

**१४)** मा.आमदार श्री.संग्राम जगताप यांनी दिलेल्या पत्रानुसार शहरातील उत्कृष्ट कार्यकरणा-या रंगकर्मी, कलाकार यांना प्रोत्साहीत करण्याच्या दृष्टीने स्व.सदाशिव अमरापुरकर (अभिनेता) व स्व.अनिल क्षिरसागर (बालीकाका) यांचे कार्य व योगदानाचे स्मरण होण्याचे दृष्टीने त्यांचे नावे सदरचा पुरस्कार महानगरपालिकेच्या वतीने देण्यास व याकामी स्वतंत्र लेखाशिर्ष निर्माण करणे त्यामध्ये रक्कम रु.३ लक्षची तरतुद करण्यांत यावी.

**१५)** मा.सदस्य यांच्या पत्रानुसार सावेडी येथील नाट्यगृहाचे काम मंजूर निविदाकार यांचेमार्फत सुरू असून या प्रस्तावात यापुर्वी मा.स्थायी समितीने १००० आसन क्षमतेबाबत केलेल्या शिफारस व निर्णयानुार शहरातील नाटय कर्मी व नाटय प्रेमी यांनी वेळो वेळी केलेली मागणी विचारात घेता या प्रकल्पाचे मंजूर निवविदाकार यांचेकडून निविदेतील कामासह वाढीव कामे करणे आवश्यक आहे. यास्तव निविदेमधील अटी शर्ती नुसार सदरची कामे करून घेण्यात यावीत. या दृष्टिने सुधारीत अंदाजपत्रक रक्कम रु.१३,५८,२७,८३०/- च्या कार्यालयीन प्रस्तावास ही सभा प्रशासकीय मान्यता देत आहे. मा.शासनाकडे मान्यतेस्तव व निधीमागणीकामी प्रस्ताव पाठविण्यात यावा.

**१६)** मा.संपत बारस्कर यांचे पत्रानुसार रेखांकन अंतर्गत सुधारणा (बांधकाम परवानगी) या लेखाशिर्षा ची तरतूद रक्कम रु. ८५ लक्ष ने वाढविण्यात यावी. तसेच विकास भार निधीतुन खर्च करण्यासाठीच्या लेखाशिर्षामध्ये रक्कम रु.२० लक्ष ची तरतुद वाढविण्यांत यावी. तसेच विकास भार निधी (जमा बाजु) रक्कम रु.६० लक्षने तरतुद वाढविण्यात यावी.

**१७)** मा.सदस्य यांचे पत्रानुसार व संबंधीत संस्थाच्या पत्रानुसार अध्यक्ष, शिववरद प्रतिष्ठान, अहमदनगर,यांचे अर्थसहाय्यात रक्कम रू.५० हजाराने वाढ करण्यात यावी. मा.अध्यक्ष,रसीक ग्रुप, यांचे संस्थेस १ लक्ष रकमेचे अर्थसहाय्य देण्यात यावे. सरगम प्रेमी मित्रमंडळ संस्था यांना रक्कम रू.५० हजार, शब्दगंध साहित्य परिषद यांना रक्कम रू.५० हजार , मा.अध्यक्ष भिमराज फाउंडेशन या संस्थेस रू.३ लक्ष इतक्या रकमेचे अर्थसहाय्य देण्यात यावे. सदरचा खर्च सामाजीक संस्थांना देणगी या लेखाशिर्षा मधून भागविण्यात यावा. तसेच ओम शांती युवा प्रतिष्ठान (ट्रस्ट) या संस्थेस निकाली जंगी कुस्त्यांचे आयोजन नागरीकांसाठी विनामुल्य करण्याकामी रक्कम रू.२ लक्ष अर्थसहाय्य महापौर चषक या लेखाशिर्षा च्या तरतूदी मधून उपलब्ध करून देण्यात यावे. तसेच मागणी केलेल्या संस्थांचे धर्मादाय आयुक्त यांचेकडील

नोंदणीकृत असलेबाबत कागदपत्रे, ताळेबंद व चार्टर्ड अकौटंट यांचेकडील हिशोब तपासणी आदी आवश्यक कागदपत्रांची खातरजमा करूनच संस्थांना अर्थसहाय्य देणेबाबत कार्यवाही करणेत यावी.

**१८)** डॉ.बाबासाहेब आंबेडकर माध्यमिक महानगरपालिका शाळा क्रमांक ४ ( रेल्वेस्टेशन ) या शाळेचे ११ वी व १२ वी वर्गासाठी विस्तारीत इमारत बांधणे बाबत अंदाजपत्रकासह प्रस्ताव तयार करण्यांत यावा. सदर कामाकरीता रक्कम रु.१० लक्ष प्राथमिक तरतुद करण्यांत यावी. सदरचा खर्च महापौर शहर विकास निधी मधून भागविण्यात यावा.

**१९)** मा.सौ.मनिषा रा.बारस्कर-काळे यांचे पत्रानुसार महात्मा फुले विद्यालय,महानगरपालिका शाळा क्रमांक १७ (सावेडी गावठाण) येथील वॉटर प्रुफींग व इतर दुरुस्ती कामे करण्यासाठी रक्कम रु.७ लक्षची तरतुद करण्यांत यावी. सदरचा खर्च महापौर शहर विकास निधीमधुन भागविण्यात यावा.

**२०)** मा.श्री कुमार वाकळे,सभागृह नेता,यांनी दिलेल्या पत्रानुसार नवीन प्रशासकीय इमारतीचे टेरेस नादुरूस्त असल्याने संबंधीत पदाधिकारी यांचे कार्यालये व इतर संबंधीत प्रशासकीय कार्यालये यांचे कार्यालयात पावसाळयाच्या काळात मोठया प्रमाणात पाणीगळती होते. याकरीता सदरच्या दुरूस्तीचे काम करण्यात यावे. तसेच नगरसचिव कार्यालय कक्षात स्थापन केलेले सर्व्हर रूम ही सदर ठिकाणी गैरसोईची असल्याने व नगरसचिव कार्यालयास कामकाजाच्या दृष्टिने जागा पुरेशी होत नसल्याने सदर सर्व्हर रूम ची सुविधा टेरेस वरील जागा निश्‍चित करून रूम बांधकाम करून सदरचे सर्व्हरचे कामकाज संपुर्ण यंत्रणेसह त्वरीत स्थलांतरीत करण्यात यावे. या कामासाठी अनुक्रमे रक्कम रूपये ९ लक्ष व रक्कम रू.७ लक्ष इतकी तरतूद करण्यात यावी व सदरचा खर्च महापौर शहर विकास निधी मधून भागविण्यात यावा.

**२१)** मा.श्री स्वप्निल शिंदे नगरसेवक यांनी सभागृहात केलेल्या चर्चेनुसार महानगरपालिका हद्दीत विविध कंपन्या केबल टाकणेसाठी खोदाई करणेपोटी महानगरपालिकेमध्ये रक्कम भरतात. अशा केबल खोदाई करिता स्वतंत्र लेखाशिर्ष तयार करुन सदर खोदाई केलेल्या कामापोटी आलेली रक्कमेसाठी स्वतंत्र खाते उघडणेत यावे. कामांच्या रक्कमेची अदायगी या खात्यातुन करण्यांत यावी.

**२२)** मा.महाराष्ट्र शासनाचे पुरातत्व खात्याच्या नियमाच्या बाबीमुळे अशा स्थळाच्या जवळपासच्या महानगरपालिकेच्या भविष्यातील पूर्व प्रशासनाने इमारतीच्या बांधकाम परवानगी बाबत योग्य ती कार्यवाही येत्या एप्रिल २०१६ अखेर सुरु करावी.

**२३)** मा.राष्ट्रीय हरित लवाद यांचेकडील घनकचरा व्यवस्थापन विभागाकरीता केलेल्या मार्गदर्शक सुचनानुसार सावेडी येथील १०० मेट्रीक टन खत प्रकल्पाचे काम दोन महिन्याचे आत पूर्ण करण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी. शहरामधील आरोग्य विषय प्रश्नांची सोडवणुक होण्यासाठी मनपा हद्दीत जास्तीत जास्त २०० कंटेनर , दोन कॉम्पॅक्टर तसेच सायकल रिक्षा , ढकलगाडी ,फायबर कुंडया आदी उपलब्ध करण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी.कचरा संकलन व वाहतुक बाबतच्या महत्वपूर्ण उपक्रम कार्यान्वीत होण्याच्या दृष्टिने प्रशासनाकडून निविदा लवकरात लवकर करण्यात यावी.

**२४)** मा.महासभा ठराव क्र.२ दिनांक ५/७/२०१४ नुसार खाजगीकरणाच्या माध्यमातून सोलर पॉवर प्रोजेक्ट राबविण्यास अनुमती दिल्यानुसार पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करणा-या यंत्रणेवरील तसेच इतरही विजबीलाच्या खर्चात बचत होण्याच्या दृष्टिने सोलर पॉवर प्रोजेक्ट योजना राबविण्याकरीता या बाबतचा डीपीआर तयार करणे तसेच संबंधीत कामासाठी कन्सलटंट / एजन्सी यांची नियुक्ती करण्याच्या दृष्टिने कार्यवाही करण्यास तसेच स्वतंत्र लेखाशिर्ष तयार करून रक्कम रू.१० लक्षची प्राथमीक तरतूद करण्यास ही सभा मान्यता देत आहे. याकामी आवश्यकतेनुसार मनपा हिश्यापोटी रकमेची तरतूद मनपा फंड /मा.शासन निधी/ शासन अंगीकृत विविध वित्तीय संस्था /बँका आदींकडून कर्ज उभारणीस ही सभा मान्यता देत आहे.

**२५)** मनपा हददीतील स्ट्रीट लाईटची देखभाल व दुरूस्ती खाजगीकरणातून संस्थेस दिल्यास सदर साहीत्य खरेदी व त्याची देखभाल व दुरूस्ती या खर्चामध्ये नियंत्रण आणणे सुलभ होणार आहे.तसेच आस्थापना सुचिवरील नियुक्त वायरमन मनपा पाणी योजना व प्रॉपर्टी याचे देखभालीसाठी उपयोगात आणता येतील व कॉन्ट्रॅक्ट बेसीस वर वायरमन करीता होणार खर्च बंद होइल. निविदाकार यांना देखभाल दुरूस्तीसह वीज बील नियंत्रणात आणणेची जबाबदारी दिल्यास खाजगीकरणाच्या माध्यमातून होणारा खर्च मनपा खर्चाच्या तुलनेत कमी होण्यास मदत होईल.अशा प्रकारे स्ट्रीट लाईटची देखभाल व दुरूस्ती खाजगीकरणातून करण्याची कार्यवाही करावी.

**२६)** भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर,महात्मा ज्योतीबा फुले आणि छत्रपती संभाजी महाराज यांचा पुर्णाकृती पुतळा बसविण्याच्या व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे स्मारक उभारण्याच्या दृष्टिने कार्यवाही करण्यात यावी.

**२७)** सावेडी भागातील नागरीकांच्या मागणीप्रमाणे या भागात स्मशानभूमी उभारण्याकरीता सदर आरक्षणाबाबत टीडीआर अथवा भूसंपादनाच्या माध्यमातून प्रशासनाने कार्यवाही तात्काळ सुरू करावी.

**२८)** महानगर पालिकेमध्ये विकास कामांना मान्यता देताना छाननी समितीच्या माध्यमातून जातानाचे प्रक्रीयेस लागणारा विलंब विचारात घेता मा.शासनाच्या निधीमधील कालबध्द स्वरूपाच्या योजना कामांचा विचार करता विकासाच्या कामाच्या दरांना मान्यता देणारी छाननी समिती ची प्रशासकीय कामकाजा दृष्टीने आवश्यकता व कायद्यातील तरतुदी तपासून आणि इतर महानगरपालिकामधील पध्दती अभ्यासून छाननी समितीच्या कामाकरीता गतीमानता आणणेस्तव दररोजच्या कामकाजातील वेळ ठेवण्याच्या दृष्टिने कार्यपध्दती निश्चित करावी.

**२९)** मा.श्री.अभय आगरकर यांच्या सुचनेनुसार महानगरपालिका हद्दीतील खोकर नाला ते अवसरकर विट भट्टी पर्यंत एका बाजूने नागरीकांना फिरण्याकरीता जॉगींग ट्रॅक करणेत यावा. याकामी रू.५लक्ष रकमेची तरतूद करण्यात यावी. सदरचा खर्च महापौर शहर विकास निधीतून भागविण्यात यावा.

**३०)** अहमदनगर महानगरपालिकेच्या कर्मचा-यांना वैद्यकीय प्रतिपुर्ती योजना लागू आहे. या योजनेच्या माध्यमातुन उपलब्ध होणा-या लाभानुसार कर्मचा-यांना विमा योजना लागू करुन त्या अंतर्गत कर्मचा-यांचा विमा उतरविणेत यावा. त्यामुळे महानगरपालिकेच्या कर्मचा-यांना वैद्यकीय प्रतिपुर्ती धर्तीवर विमा योजना व्दारे लाभ मिळण्याच्या दृष्टीने कॅशलेस विमा योजना, मेडिकल क्लेम अथवा नामांकित तसेच शासन अंगीकृत काम करणा-या विमा व्यवसाय संस्था यांचेशी संपर्क साधुन महानगरपालिकेमध्ये विमा योजना लागू करण्याच्या दृष्टीने मा.आयुक्त यांनी लवकरात लवकर कार्यवाही करावी. अशा प्रकारची विमा योजना लागू केल्यास संबंधित लाभार्थी यांना लवकरात लवकर सहाय्य होणे सुलभ होवून महानगरपालिकेच्या आरोग्य प्रतिपुर्ती योजनेवर होणारा खर्च तौलनिक दृष्टया कमी होण्यास मदत होईल.

**३१)** विविध कारणासाठी होणा-या रस्ते खोदाई यामधुन महानगरपालिकेस उपलब्ध होणा-या शुल्कातुन रस्ते करण्या बाबत पार पाडावयाच्या कार्यवाहीसह यापुर्वी महानगरपालिकेस मा.न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार देखील कामे पार पाडणे आवश्यक आहे. यास्तव २ कोटी ५० लक्ष रक्कमेची तरतुद ठेवणे बाबत मान्यता देण्यात येत आहे.

**३२)** नगर शहर व परिसरातील राष्ट्रसंत आनंदऋषीजी महाराज साहेब यांचे समाधीस्थळ , विशाल गणपती मंदिर, केडगांव येथील रेणुका देवी, भिस्तबाग महाल, अहमद शहा बादशहा यांचे समाधीस्थळ परिसर बागरोजा, दत्त देवस्थान वेदांन्तनगर, ऐतिहासिक वस्तु संग्रहालय, शाह शरीफ दर्गा मुकुंदनगर परिसर, या ऐतिहासिक व धार्मिक महत्व असलेल्या स्थळांचा अहमदनगर येथे भेट देणा-या पर्यटकांना माहिती व्हावी याकरीता त्याचे संबंधित महत्व याची सविस्तर माहिती छायाचित्रे, व्हीडीओ चित्रीकरण यासह या परिसरात पर्यटक भेट देतील त्या दृष्टीने त्यांना सुविधा उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने करावयाची कामे या बाबतचा प्रकल्प अहवाल तयार करुन मा.शासनाकडे

तो सादर केल्यास पर्यटन विकास विभागाकडुन अर्थसहाय्य मिळण्यास मदत होईल. व अशी पुरातन काळातील महत्वाची स्थळे विकसीत झाल्यास याठिकाणी रोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध होतील यादृष्टीने कार्यवाही करण्यात यावी.

**३३)** शहरामधील होर्डिंग्ज बोर्ड तसेच जाहीरातीचे बोर्ड याबाबत दिवसेंदिवस जाहीराती करणाचे महत्व लक्षात घेता यामधुन मिळणारे उत्पन्नात वाढ होणे अपेक्षित आहे. याकरीता प्रशासनाने या कामास व्यापक स्वरुप देण्याचे दृष्टीने जाहीरात कर/फी विभाग स्वतंत्र कक्ष निर्माण करुन विभाग प्रमुख, लिपीक, शिपाई यासह सुसज्ज यंत्रणा उभारल्यास निश्चितपणे उत्पन्न वाढण्यास मदत होईल. उत्पन्नाचे स्त्रोत वाढविण्याचे दृष्टीने सदरची बाब महत्वाची असल्याने या कामास प्राधान्य देण्यात यावे.तसेच मनपा च्या उत्पन्नात वाढ होण्याकरीता मनपाच्या मालकीच्या मोकळया जागा तसेच मालमत्ता या मध्ये बँकांना ए.टी.एम.करीता भाडेतत्वावर जागा उपलब्ध करून दिल्यास नागरीकांना या माध्यमातून सुविधा उपलब्ध होईल.

**३४)** शहरातील ओढे / नाले सफाई बाबत निविदा मागविणे व तत्सम कार्यालयीन सोपस्कार लवकरात लवकर पुर्ण करुन घेणेच्या दृष्टीने कार्यवाही करण्यात यावी. तसेच कालबध्द कार्यक्रम निश्चित करुन या साफसफाई करीताची कार्यवाही १५ मे २०१६ अखेर पुर्ण करुन घेण्यात यावी.

उत्पन्नाच्या बाजू सक्षम करण्याच्या दृष्टिने उपाययोजना सुचविताना वेळोवेळी अंदाजपत्रकाच्या निर्णयात विविध बाबींचा समावेश केला जातो. या बाबी विचारात घेउन त्यावर उचित कार्यवाही करण्यात यावी.

सन २०१५-२०१६ चे सुधारित व सन २०१६-२०१७ सालचे मुळ अंदाजपत्रक, मा.स्थायी समितीने केलेल्या शिफारशी त्याबाबत मा.महासभेत झालेली चर्चा त्यामध्ये अंदाजपत्रकाच्या प्रस्तावात मा.महासभेने सुचित केलेले बदल, दुरूस्त्या व फेरफार यासह व सोबत जोडलेल्या तक्त्याप्रमाणे मान्यता देण्यात येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर. खर्च मंजूर. नियमाप्रमाणे पुढील योग्य ती कार्यवाही करावी. या सभेचे इतिवृत्त कायम होण्याची प्रतिक्षा न करता कार्यवाही करावी यास ही सभा मान्यता देत आहे.

तसेच सदर अंदाजपत्रकाच्या २०० प्रती छापून घेण्यास व त्याकामी येणा-या खर्चास ही सभा मान्यता देण्यात येत आहे. खर्च मंजूर.

नियमानुसार कार्यवाही करावी.

सुचक - मा.श्री.कुमार बबनराव वाकळे,

अनुमोदक - मा.श्री.संपत विजय बारस्कर

ठराव सर्वानुमताने मंजूर.

सही /-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

| अ.नं. | नांव | वाढ खर्च बाजू | वाढ जमा बाजू | तरतूदीमधून कमी केले |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | कुष्ठपिडीत रुग्ण, अपंग कुष्ठपिडीत रुग्ण यांचा पोषणाचा खर्च | ७ लक्ष | | ३ लक्ष |
| २ | केडगांव भागातील इंदिरानगर, ताराबाग कॉलनी, श्रीराम कॉलनी अंतर्गत पाईपलाईन टाकणे | १.८५ लक्ष | | |
| ३ | केडगाव पाणी पुरवठा योजना फेज-१ नळ कनेक्शन नविन लाईनवर स्थलांतरीत करणे | १ कोटी २५ लक्ष | | |
| ४ | केडगाव पाणी पुरवठा योजना फेज - १ स्थलांतरीत नळजोडणी पासुन उत्पन्न | | १ कोटी २५ लक्ष | |
| ५ | शहर पाणी पुरवठा योजना फेज-२ नळ कनेक्शन नविन लाईनवर स्थलांतरीत करणे | १५ लक्ष | | |
| ६ | शहर पाणी पुरवठा योजना फेज -२स्थलांतरीत नळजोडणी पासुन उत्पन्न | | १५ लक्ष | |
| ७ | भाग्योदय मंगल कार्यालय नुतनीकरण करणे | १० लक्ष | | |
| ८ | प्राथमिक सोयी सुविधा | १.३७ लक्ष | | |
| ९ | मागासक्षेत्र विकास निधी | ४ कोटी | | |
| १० | नगरशहर पर्यटन विकास निधी | २८ लक्ष | | |
| ११ | महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान योजना | ७० कोटी | | |
| १२ | महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान योजना मनपा हिस्सा | ३० कोटी | | |
| १३ | बालविकास प्रकल्प अंतर्गत (अंगणवाडी बांधणे) | ७८ लक्ष | | |
| १४ | स्व.सदाशिव अमरापुरकर (अभिनेता) व स्व.अनिल क्षिरसागर (बालीकाका) पुरस्कार | ३ लक्ष | | |
| १५ | रेखांकन अंतर्गत सुधारणा (बांधकाम परवानगी) | ८५ लक्ष | | |
| १६ | विकास भार निधीतुन खर्च | २० लक्ष | | |
| १७ | महात्मा फुले विद्यालय,महानगरपालिका शाळा क्रमांक १७ (सावेडी गावठाण) येथील वॉटर प्रुफींग व इतर दुरुस्ती कामे करणे | ७ लक्ष | | |
| १८ | डॉ.बाबासाहेब आंबेडकर माध्यमिक महानगरपालिका शाळा क्रमांक ४ ( रेल्वेस्टेशन ) या शाळेचे ११ वी व १२ वी वर्गासाठी विस्तारीत इमारत बांधणे | १० लक्ष | | |
| १९ | महापौर शहर विकास निधी | ७ कोटी | | |
| २० | स्मशानभूमी सुधारणा व नविन स्मशानभूमी (केडगांव अमरधाम -५ लक्ष, आदर्श अमरधाम स्टेशन रोड-५ लक्ष, सावेडी अमरधाम - ५ लक्ष, नालेगांव अमरधाम - १० लक्ष. | | | ५लक्ष |
| २१ | एकात्मीक गृह निर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रम फेज - १ | | | १८ लक्ष |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २२ | एकात्मीक गृह निर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रम फेज - २, मनपा.हिस्सा. | १८लक्ष ६२ हजार | | |
| २३ | सामाजिक संस्थांना देणगी | १० लक्ष | | |
| २४ | महानगरपालिका हद्दीत पर्यटन विकास डी.पी.आर. तयार करणे | १ लक्ष | | |
| २५ | सर्वसाधारण कर | | ६९ लक्ष | |
| २६ | वृक्षकर | | ९ लक्ष | |
| २७ | घनकचरा व्यवस्थापन सेवा कर | | ११ लक्ष | |
| २८ | ड्रेनेज कर | | ३३ लक्ष | |
| २९ | जललाभ कर | | ७ लक्ष | |
| ३० | मललाभ कर | | ७ लक्ष | |
| ३१ | रस्ता कर | | ७ लक्ष | |
| ३२ | मोबाईल टॉवर दंडात्मक कारवाईचे उत्पन्न | | ३० लक्ष | |
| ३३ | थकीत देयके अदा करणे | | ७ कोटी | |
| ३४ | अनधिकृत बांधकाम नियमानुकूल | | २५ लक्ष | |
| ३५ | जाहीरात बोर्ड जागा भाडे | | २५ लक्ष | |
| ३६ | सौभाग्य सदन मंगलकार्यालय नुतनीकरण | १० लक्ष | | |
| ३७ | आपत्कालीन व्यवस्थापन खर्च (बांधकाम) | ४० लक्ष | | |
| ३८ | खाजगी करणाच्या माध्यमातुन सोलर पॉवर प्रोजेक्ट राबविणे. | १० लक्ष | | |

महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

१. सभागृह नेता यांनी तरतुदी मध्ये सुचविलेल्या वाढीस मंजूरी देण्यात येत आहे.

२. मा.उपमहापौर यांचे पत्रानुसार केडगाव पाणी योजनसाठी १ कोटीची तरतूद करणेस मान्यता देण्यात येत आहे.

३. माजी नगराध्यक्ष तथा नगरसेवक मा.श्री अभय आगरकर यांचे पत्रानुसार महात्मा ज्योतिबा फुले जयंती निमित्ताने महात्मा जोतीबा फुले , माता सावित्रीबाई फुले यांचे जीवनावरील छोटी मोठी पुस्तके शालेय विदयार्थ्यांना मोफत वितरीत करणेसाठी ५० हजार तरतूद करणेत यावी.

४. मा.उपमहापौर यांचे पत्रानुसार केडगांव पाणी योजनेतील नळ जोडणी कामासाठी १ कोटी २५ लक्ष तरतूद करावी.

५. मा.श्री विपुल शेटीया नगरसेवक यांचे पत्रानुसार फेज-२ अंतर्गत नळ कनेक्शन स्थलांतरीत करणेसाठी तरतूद करणेत यावी.

६. नगरसेवक मा.श्री विजय गव्हाळे ,मा.श्री विपुल शेटीया, मा.श्री सचिन जाधव यांचे चर्चेनुसार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे १२५ वी जयंती महोत्सव साजरा करिता असलेने जयंती उत्सव साजरा करणेसाठी १५ लक्षची तसेच मंगलगेट समाज मंदिर नूतनी करणासाठी ७ लक्षची तरतूद करणेत यावी.

७. नगरसेवक मा.श्री विजय गव्हाळे यांचे चर्चेनुसार मनपा शाळा क्रं.४ येथे नविन विस्तारीत इमारत बांधणेसाठी तरतूद करणेत यावी.

८. मा.श्री स्वप्निल शिंदे नगरसेवक यांचे मागणीनुसार शहरातील केबल खोदाई करिता स्वतंत्र लेखाशिर्ष तयार करावा तसेच स्वतंत्र खाते उघडणेत यावे.

९. मा.नगरसेवक श्री.बाळासाहेब बोराटे व इतर मा.सदस्य यांनी सभागृहात केलेल्या मागणीनुसार अनधिकृत मोबाईल टॉवरच्या दंड वसुली बाबत दिनांक ३० एप्रिल २०१६ पर्यंत कार्यवाही करणेत यावी.

१०.पुरातत्व खात्याचे नियमाच्या बाबीमुळे अशा स्थळाच्या जवळपासच्या महानगरपालिकेच्या भविष्यातील पूर्व प्रशासनाने इमारतीच्या बांधकाम परवानगी बाबत योग्य ती कार्यवाही येत्या एप्रिल २०१६ अखेर सुरु करावी.

सन २०१५-२०१६ चे सुधारीत व सन २०१६-२०१७ सालचे मुळ अंदाजपत्रका बाबत मा.स्थायी समितीच्या शिफारशी, मा.महासभेत झालेली चर्चा, मा.महासभेमध्ये मा.सदस्यांनी केलेल्या सूचना तसेच दुरुस्त्या फेरफार यासह व सोबत जोडलेल्या तक्त्याप्रमाणे अंदाजपत्रकास ही सभा मान्यता देत आहे. तसेच मा.महासभेमध्ये प्रामुख्याने झालेल्या चर्चेनुसार कार्यवाही करणेस ही सभा मान्यता देत आहे. खर्च मंजूर.

नियमानुसार कार्यवाही करण्यांत यावी.

तसेच सदर अंदाजपत्रकाच्या २०० प्रती छापून घेण्यास व त्याकामी येणा-या खर्चास ही सभा मान्यता देत आहे.

सुचक - मा.श्री.

अनुमोदक - मा.श्री.

ठराव सर्वानुमताने मंजूर.

महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

प्रति,
पोलीस निरीक्षक,
तोफखाना पोलिस स्टेशन,
अहमदनगर.

विषय : मंगळवार दिनांक २९/०३/२०१६ रोजी होणा-या अहमदनगर महानगरपालिकेच्या मा.अर्थसंकल्पीय सर्वसाधारण सभेसाठी पोलीस बंदोबस्त मिळणे बाबत...

महोदय,

उपरोक्त विषयानुसार कळविण्यांत येते की, मंगळवार दिनांक २९/०३/२०१६ रोजी सकाळी ११.०० वाजता अहमदनगर महानगरपालिकेची मा. अर्थसंकल्पीय सर्वसाधारण सभा **नविन प्रशासकीय इमारत, अहमदनगर महानगरपालिकेचे सभागृह, अहमदनगर** येथे होणार आहे.

तरी सदर दिवशी कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीकोनातुन अहमदनगर महानगरपालिका सभागृहास पुरेसा पोलीस बंदोबस्त मिळणे बाबत विनंती आहे.

उपायुक्त,
अहमदनगर महानगरपालिका.

प्रत : मा.महापौर साहेब, अहमदनगर महानगरपालिका, यांचेकडेस माहितीस सादर.

प्रत : मा.आयुक्त साहेब, अहमदनगर महानगरपालिका, यांचेकडेस माहितीस सादर.

प्रत : मा.पोलीस अधिक्षक, पोलिस अधिक्षक कार्यालय, अहमदनगर, यांचेकडेस माहितीस सादर.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.
जा.क्र.नगरसचिव/AMC.-
दिनांक : /०३/२०१६.

संबंधीत खाते प्रमुख व शाखा प्रमुख,
अहमदनगर महानगरपालिका,
अहमदनगर.

यांस.-

कळविण्यात येते की, अहमदनगर महानगरपालिकेची मा. अर्थसंकल्पीय सर्वसाधारण सभा मंगळवार दिनांक २९/०३/२०१६ रोजी सकाळी ११.०० वाजता **नविन प्रशासकीय इमारत, अहमदनगर महानगरपालिकेचे सभागृह, अहमदनगर** येथे बोलविण्यात आलेली आहे.

तरी आपल्या नावासमोर दर्शविलेल्या कामाची आपण पुर्तता करावी.

उपायुक्त,
अहमदनगर महानगरपालिका.

प्रत :-

| | | | |
|---|---|---|---|
| १) | शहर अभियंता | : | या सभेकरीता स्टेजवरील व्यवस्थेसह हॉलमधील मा.नगरसेवकांच्या संख्येनुसार तसेच विभाग प्रमुख, पत्रकार व नागरिक यांच्या संख्येनुसार सभागृहातील बैठक व्यवस्था पाहुन ज्या सोयी सुविधा सभेसाठी आवश्यक असतील त्या कराव्यात |
| २) | घनकचरा व्यवस्थापन विभाग प्रमुख | : | महानगरपालिका सभागृहाचे आसपासचे भागाची साफसफाई करुन घेण्याबाबत संबंधितांस सुचना द्याव्यात. |
| ३) | प्रसिध्दी अधिकारी | : | बैठकीची सुचना व विषयपत्रिका या सोबत जोडली आहे. त्याची जाहिरात स्थानिक वृत्तपत्रात त्वरीत प्रसिध्द करावी व प्रसिध्दीचे २ (दोन) अंक इकडेस पाठवावेत. |
| ४) | इलेक्ट्रीक सुपरवायझर | : | वरीलप्रमाणे नोंद घेवून महानगरपालिका सभागृहातील सभेकरीता लाईट व लाऊड स्पीकरची व्यवस्था करण्यात यावी. तसेच नेहमीप्रमाणे टेपरेकॉर्डची सुध्दा व्यवस्था करण्यात यावी. |
| ५) | श्री.एल.डी.बनकर, रक्तपेढी विभाग | : | महानगरपालिका सभागृहात सभेपुर्वी उपस्थित राहुन सभेच्या वेळेस विषय वाचन करावे. |
| ६) | श्री.दत्तात्रय ढवळे, स्वीय सहा. आयुक्त कार्यालय, | : | आपण सभेपुर्वी महानगरपालिका सभागृहात उपस्थित राहुन संपुर्ण सभेचे प्रोसिडींग घेण्याचे काम करावे. |
| ७) | श्री.अशोक चेन्नुर, पाणीपुरवठा विभाग | : | महानगरपालिका सभागृहात राष्ट्रगीत म्हणणे करीता सभेपुर्वी उपस्थित रहावे. |
| ८) | मनपा हवालदार | : | वरील प्रमाणे नोंद घेवुन महानगरपालिका सभागृहात आवश्यक ती पुर्तता करावी. |

प्रत : मा.महापौर साहेब, अहमदनगर महानगरपालिका यांचेकडेस माहितीस सादर.
प्रत : मा.आयुक्त साहेब, अहमदनगर महानगरपालिका यांचेकडेस माहितीस सादर.

कार्यालयीन आदेश.

अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.
जा.क्र.नगरसचिव.AMC.-
दिनांक : / ०३ /२०१६.

१) श्री.शंकर बहिरवाडे, आयुक्त कार्यालय,
२) श्री.शांतवन बडेकर, उपायुक्त कार्यालय,
३) श्री.राजेश मकाटील, महापौर कार्यालय,
४) श्री.सुरेश विठ्ठल भुतकर, ऑडीट विभाग.
५) श्री.संदीप फाळके, नगररचना विभाग,
६) श्री.राहुल जगन्नाथ शिंदे, कामगार विभाग
७) श्री.गणेश वरुटे, सामान्य प्रशासन विभाग,
८) श्री.प्रशांत बाबासाहेब आंबेकर, प्रसिध्दी विभाग
९) श्री.बापू बेल्हेकर, प्रकल्प विभाग,
१०) श्री.आनंद झारखंडे, महिला व बालकल्याण विभाग,
११) श्री.संजय डहाळे, सभागृहनेता कार्यालय,
अहमदनगर महानगरपालिका.

यांस.-

आदेशीत करण्यात येते की, अहमदनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा मंगळवार दिनांक २९/०३/२०१६ रोजी सकाळी ११.०० वाजता **नविन प्रशासकीय इमारत, अहमदनगर महानगरपालिकेचे सभागृह, अहमदनगर** येथे होणार आहे.

तरी आपण सकाळी १०.०० वाजता कार्यालयीन गणवेशात हजर रहावे व मनपा हवालदार यांच्या सूचनेनुसार काम पहावे. तसेच सदर दिवशी जर सभा तहकुब झाली तर तहकुब सभा ज्या दिवशी आयोजित करण्यात येईल त्या दिवशीही वरीलप्रमाणे कामाची पुर्तता करावी. त्याबाबत स्वतंत्र आदेश निर्गमित करण्यांत येणार नाहीत.

प्र.नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

प्रत : महानगरपालिका हवालदार, अहमदनगर महानगरपालिका यांस माहितीस व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.
जा.क्र.नगरसचिव/AMC.-
दिनांक : /०३/२०१६.

घनकचरा व्यवस्थापन प्रमुख,
अहमदनगर महानगरपालिका,
अहमदनगर.

**विषय :- दिनांक १६/०३/२०१६ रोजीची मा.सर्वसाधारण सभा.**

आदेशीत करण्यांत येते की, अहमदनगर महानगरपालिकेची मा.सर्वसाधारण सभा बुधवार दिनांक १६/०३/२०१६ रोजी दुपारी १.०० वाजता **नविन प्रशासकीय इमारत, अहमदनगर महानगरपालिकेचे सभागृह, अहमदनगर** येथे बोलविण्यात आलेली आहे. सदर विषयपत्रिकेतील विषय क्रमांक ३९, ५१ आपले विभागाशी निगडीत असल्याने या विषयाची अद्यावत व परिपूर्ण टिपणी त्वरीत मा.आयुक्त व मा.उपायुक्त यांचेकडेस सादर करावी.

तसेच विषय क्रमांक ....... अन्वये मागील सभा क्रमांक २ दिनांक ३१/०८/२०१५ व सभा क्रमांक ३ दिनांक ०९/११/२०१५ रोजीचे इतिवृत्तात नमूद करण्यात आलेल्या बाबींवर लिखीत टिपणी त्या सोबत सादर करण्यात यावी.

तसेच सभेस आपण निर्धारीत वेळेच्या अर्धातास आधी महानगरपालिका मुख्यालयात उपस्थित रहावे. कोणत्याही परिस्थितीत प्रतिनिधी वा माहितगार कर्मचारी आपल्या वतीने अत्यावश्यक असल्याखेरीज मा.आयुक्त तसेच मा.महापौर तथा पिठासीन अधिकारी यांची परवानगी घेतल्याशिवाय गैरहजर राहू नये.

उपायुक्त (सा),

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.
जा.क्र.नगरसचिव/AMC.-
दिनांक :        /०३/२०१६.

आरोग्य विभाग प्रमुख,
अहमदनगर महानगरपालिका,
अहमदनगर.

**विषय :- दिनांक १६/०३/२०१६ रोजीची मा.सर्वसाधारण सभा.**

आदेशीत करण्यांत येते की, अहमदनगर महानगरपालिकेची मा.सर्वसाधारण सभा बुधवार दिनांक १६/०३/२०१६ रोजी दुपारी १.०० वाजता **नविन प्रशासकीय इमारत, अहमदनगर महानगरपालिकेचे सभागृह, अहमदनगर** येथे बोलविण्यात आलेली आहे. सदर विषयपत्रिकेतील विषय क्रमांक ४० आपले विभागाशी निगडीत असल्याने या विषयाची अद्यावत व परिपूर्ण टिपणी त्वरीत मा.आयुक्त व मा.उपायुक्त यांचेकडेस सादर करावी.

तसेच विषय क्रमांक ....... अन्वये मागील सभा क्रमांक २ दिनांक ३१/०८/२०१५ व सभा क्रमांक ३ दिनांक ०९/११/२०१५ रोजीचे इतिवृत्तात नमूद करण्यात आलेल्या बाबींवर लिखीत टिपणी त्या सोबत सादर करण्यात यावी.

तसेच सभेस आपण निर्धारीत वेळेच्या अर्धातास आधी महानगरपालिका मुख्यालयात उपस्थित रहावे. कोणत्याही परिस्थितीत प्रतिनिधी वा माहितगार कर्मचारी आपल्या वतीने अत्यावश्यक असल्याखेरीज मा.आयुक्त तसेच मा.महापौर तथा पिठासीन अधिकारी यांची परवानगी घेतल्याशिवाय गैरहजर राहू नये.

उपायुक्त (सा),

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

**मंगळवार दिनांक २९/०३/२०१६ रोजी सकाळी ११.०० वाजता महानगरपालिका सभागृहात होणा-या मा.सर्वसाधारण सभेची सुचना व विषय पत्रिका मिळाले बाबत स्वाक्षरी.**

**---*---**

| अ.नं. | यादी नंबर | कर्मचा-याचे नांव | स्वाक्षरी |
|---|---|---|---|
| १ | १ | श्री.भोर बी.डी. | |
| २ | २ | श्री.क्षिरसागर किरण | |
| ३ | ३ | श्री.काटकर ज्ञानेश्वर | |
| ४ | ४ | श्री.कांबळे संतोष | |

सन २०१५-२०१६ चे सुधारीत व सन २०१६-२०१७ चे मुळ अंदाजपत्रका बाबत मा.स्थायी समितीच्या शिफारशी, मा.महासभेमध्ये मा.सदस्यांनी केलेल्या सूचना तसेच दुरुस्त्या फेरफार यासह अंदाजपत्रकास ही सभा मान्यता देत आहे. तसेच मा.महासभेमध्ये प्रामुख्याने झालेल्या चर्चेनुसार पुढील मुद्याबाबत कार्यवाही करणेस ही सभा मान्यता देत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर. खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील योग्य ती कार्यवाही करावी.

तसेच सदर अंदाजपत्रकाच्या २०० प्रती छापून घेण्यास व त्याकामी येणा-या खर्चास ही सभा मान्यता देत आहे.

१. सभागृह नेता यांनी तरतुदी मध्ये सुचविलेल्या वाढीस मंजूरी देण्यात येत आहे.

२. मा.उपमहापौर यांचे पत्रानुसार केडगाव पाणी योजनसाठी १ कोटीची तरतूद करणेस मान्यता देण्यात येत आहे.

३. माजी नगराध्यक्ष तथा नगरसेवक मा.श्री अभय आगरकर यांचे पत्रानुसार महात्मा ज्योतिबा फुले जयंती निमित्ताने महात्मा जोतीबा फुले , माता सावित्रीबाई फुले यांचे जीवनावरील छोटी मोठी पुस्तके शालेय विदयार्थ्यांना मोफत वितरीत करणेसाठी ५० हजार तरतूद करणेत यावी.

४. मा.उपमहापौर यांचे पत्रानुसार केडगांव पाणी योजनेतील नळ जोडणी कामासाठी १ कोटी ५० लक्ष तरतूद करावी.

५. मा.श्री विपुल शेटीया नगरसेवक यांचे पत्रानुसार फेज-२ अंतर्गत नळ कनेक्शन स्थलांतरीत करणेसाठी तरतूद करणेत यावी.



६. नगरसेवक मा.श्री विजय गव्हाळे ,मा.श्री विपुल शेटीया, मा.श्री सचिन जाधव यांचे चर्चेनुसार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे १२५ वी जयंती महोत्सव साजरा करिता असलेने जयंती उत्सव साजरा करणेसाठी १५ लक्षची तसेच मंगलगेट समाज मंदिर नूतनी करणासाठी ७ लक्षची तरतूद करणेत यावी.

७. नगरसेवक मा.श्री विजय गव्हाळे यांचे चर्चेनुसार मनपा शाळा क्रं.४ येथे नविन विस्तारीत इमारत बांधणेसाठी तरतूद करणेत यावी.

८. मा.श्री स्वप्निल शिंदे नगरसेवक यांचे मागणीनुसार शहरातील केबल खोदाई करिता स्वतंत्र लेखाशिर्ष तयार करावा तसेच स्वतंत्र खाते उघडणेत यावे.

९. मा.नगरसेवक श्री.बाळासाहेब बोराटे व इतर मा.सदस्य यांनी सभागृहात केलेल्या मागणीनुसार अनधिकृत मोबाईल टॉवरच्या दंड वसुली बाबत दिनांक ३० एप्रिल २०१६ पर्यंत कार्यवाही करणेत यावी.

१०. पुरातत्व खात्याचे नियमाच्या बाबीमुळे अशा स्थळाच्या जवळपासच्या महानगरपालिकेच्या भविष्यातील पूर्ण करावयाच्या प्रकल्पाचे, इमारतीच्या बांधकाम परवानगी बाबत योग्य ती कार्यवाही येत्या एप्रिल २०१६ अखेर सुरु करावी.

| अ.नं. | नांव | तरतुद |
|---|---|---|
| **१** | **२** | **३** |
| १ | कुष्ठपिडीत रुग्ण, अपंग कुष्ठपिडीत रुग्ण यांचा पोषणाचा खर्च | ७ लक्ष |
| २ | केडगांव भागातील इंदिरानगर, ताराबाग कॉलनी, श्रीराम कॉलनी अंतर्गत पाईपलाईन टाकणे | १.८५ लक्ष |
| ३ | केडगाव पाणी पुरवठा योजना फेज-१ नळ कनेक्शन नविन लाईनवर स्थलांतरीत करणे | १ ोटी २५ लक्ष |
| ४ | केडगाव पाणी पुरवठा योजना फेज - १ स्थलांतरीत नळजोडणी पासुन उत्पन्न | १ कोटी २५ लक्ष |
| ५ | शहर पाणी पुरवठा योजना फेज-२ नळ कनेक्शन नविन लाईनवर स्थलांतरीत करणे | १५ लक्ष |
| ६ | शहर पाणी पुरवठा योजना फेज -२स्थलांतरीत नळजोडणी पासुन उत्पन्न | १५ लक्ष |
| ७ | भाग्योदय मंगल कार्यालय नुतनीकरण करणे | १० लक्ष |
| ८ | प्राथमिक सोयी सुविधा | १.३७ लक्ष |
| ९ | मागासक्षेत्र विकास निधी | ४ कोटी |
| १० | नगरशहर पर्यटन विकास निधी | २८ लक्ष |
| ११ | महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान योजना | ७० कोटी |
| १२ | महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान योजना मनपा हिस्सा | ३० कोटी |
| १३ | बालविकास प्रकल्प अंतर्गत (अंगणवाडी बांधणे) | ७८ लक्ष |
| १४ | स्व.सदाशिव अमरापुरकर (अभिनेता) व स्व.अनिल क्षिरसागर (बालीकाका) पुरस्कार | ३ लक्ष |
| १५ | महात्मा फुले विद्यालय,महानगरपालिका शाळा क्रमांक १७ (सावेडी गावठाण) येथील वॉटर प्रुफींग व इतर दुरुस्ती कामे करणे | ७ लक्ष |
| १६ | डॉ.बाबासाहेब आंबेडकर माध्यमिक महानगरपालिका शाळा क्रमांक ४ ( रेल्वेस्टेशन ) या शाळेचे ११ वी व १२ वी वर्गासाठी विस्तारीत इमारत बांधणे | १० लक्ष |
| १७ | स्मशानभूमी सुधारणा व नविन स्मशानभूमी (केडगांव अमरधाम -५ लक्ष, आदर्श अमरधाम स्टेशन रोड-५ लक्ष, सावेडी अमरधाम - ५ लक्ष, नालेगांव अमरधाम - १० लक्ष. | |
| १८ | महानगरपालिका हद्दीत पर्यटन विकास डी.पी.आर. तयार करणे | १ लक्ष |
| १९ | सौभाग्य सदन मंगलकार्यालय नुतनीकरण | १० लक्ष |

महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.
नगरसचिव विभाग -
दिनांक : ३१ /०३/२०१६.

विषय : मंगळवार दिनांक २९/०३/२०१६ रोजी सकाळी ११.०० वा. झालेल्या मा.अर्थसंकल्पीय सर्वसाधारण सभा क्रमांक ६ च्या चहापान खर्चास कार्योत्तर मंजूरी मिळणेबाबत...

सादर,

विनंती रिपोर्ट की, महाराष्ट्र शासनाचे शासन परिपत्रक क्रमांक एम.सी.ओ. ४६८५-१८८२ सी. आर.६८-८६-युडी- १४ दिनांक २९ जुलै १९८६ अन्वये कळविले आहे की, चहा व इतर पदार्थांचे दर बदलत असतात म्हणून चहापानाचे कमाल दर परिपत्रकान्वये ठरवून देण्याची आवश्यकता वाटत नाही. कौन्सीलच्या सांविधीक समितीच्या बैठकीसाठी मनपा/नपा यांनी चहापानाचा खर्च आकस्मिक निधीतून (कॉन्टीजन्सी एक्सपेंन्डीचर) किती करावा हे प्रत्येक नगरपालिकेने ठरवावे त्याप्रमाणे खर्च करावा, अशी तरतूद आहे.

अहमदनगर महानगरपालिका सर्वसाधारण सभा क्र. १ दिनांक १७/०२/२०१२ अन्वये अहमदनगर महानगरपालिका खास सभा/सर्वसाधारण सभेचा चहापान खर्च रक्कम रु. १८,०००/- करणेत आला आहे. अहमदनगर महानगरपालिकेची मा.अर्थसंकल्पीय सर्वसाधारण सभा **मंगळवार दिनांक २९/०३/२०१६ रोजी सकाळी ११.०० वाजताची तहकुब सभा बुधवार दिनांक ३०/०३/२०१६ रोजी पुन्हा** नविन प्रशासकीय इमारत, अहमदनगर महानगरपालिकेचे सभागृह, अहमदनगर येथे झाली आहे.

सदर अहमदनगर महानगरपालिकेच्या सभागृहात आयोजित केलेल्या या सभेस उपस्थित सभासदांचे चहापानाकरीता रक्कम रु.१६,९५०/- (अक्षरी रक्कम रुपये सोळा हजार नउशे पन्नास फक्त) च्या झालेल्या खर्चास कार्योत्तर मंजुरी मिळावी. सदरचा खर्च नगरसचिव विभागाच्या * **सभेचे चहा नाष्टा बील** * या लेखाशिर्षाअंतर्गत दर्शविण्याच्या मान्यतेस्तव तसेच सदरचा खर्च श्री.एम.एम.वैद्य, नगरसचिव, अहमदनगर महानगरपालिका यांनी केला असुन सदरचा धनादेश श्री.एम.एम.वैद्य, यांचे नांवे काढणे बाबत मुख्यलेखाधिकारी यांना आपलेस्तरावरुन आदेश होणेस विनंती आहे.

| | | |
|---|---|---|
| **तरतुद** | : | **४,००,०००/-** |
| **पुर्वीचा खर्च** | : | **१,५६,१८७/-** |
| **हया बीलात दाखविलेला खर्च** | : | **१६,९५०/-** |
| **उपलब्ध शिल्लक** | : | **२,२५,८६३/-** |

प्र.नगरसचिव,
नगरसचिव विभाग,
अहमदनगर महानगरपालिका.

**६)** मा.सौ.सुवर्णा संदीप कोतकर, उपमहापौर यांचे पत्रानुसार व सभागृहातील चर्चेनुसार केडगांव  परिसरातील कोणताही नागरीक वंचित रहाणार नाही या दृष्टीने UIDSSMT केडगांव पाणीपुरवठा योजनेच्या शिल्लक राहिलेल्या रक्कमेमधुन उर्वरीत भागाचा तातडीने सर्व्हे करुन जलवाहिन्या टाकण्याचे दृष्टीने UIDSSMT केडगांव पाणीपुरवठा योजना या लेखाशिर्षामध्ये रक्कम रु. १ कोटीची तरतुद करण्यात यावी.

**७)** मा.सौ.सुवर्णा संदीप कोतकर, उपमहापौर यांचे पत्रानुसार व सभागृहातील चर्चेनुसार केडगांव भागातील इंदिरानगर, ताराबाग कॉलनी, श्रीराम कॉलनी अंतर्गत पाईपलाईन टाकणे या लेखाशिर्षावर रक्कम रु.१.८५ लक्ष ची तरतुद करण्यांत यावी.  तसेच केडगांव पाणीपुरवठा योजनेतुन स्थलांतरीत  नळजोडणी पासुन उत्पन्न या लेखाशिर्षा मध्ये रक्कम रु.१ कोटी २५ लक्षची तरतुद करण्यांत यावी. केडगांव पाणीपुरवठा योजनेतुन नळजोडणी स्थलांतरीत करणे या लेखाशिर्षामध्ये रक्कम रु.१ कोटी २५ लक्षची तरतुद दर्शविण्यांत यावी.

म.न.पा. आकृतीबंधाच्या माध्यमातून प्रशासकीय कामकाजाची गती वाढणार असून नुकताच मा.शासनाने  मनपा च्या कर्मचारी  आकृतीबंधास मान्यता दिली असून या बाबतची पुढील कार्यवाही सुरू असून संबंधीत विभागाने मनपाच्या तांत्रीक तसेच अधिकारी,कर्मचारी यांची पदे लवकरात लवकर भरण्याच्या दृष्टीने कार्यवाही करावी.